# माणूस

शनिवार । ३० सप्टेंबर १९७८
७५ पैसे

पंडित नेहरूंनी 'भारताचा शोध' घेतला पण 'भारतीयत्व' कशात आहे हे त्यांनी आपल्या ग्रंथात निःसंदिग्धरीत्या कुठेही सांगितलेले नाही. पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी हा भारतीयत्वाचा शोध घेण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. इतकेच नाही तर या भारतीयत्वाच्या आदर्शाप्रमाणे ते प्रत्यक्षात जगले-वागलेही. त्यांच्या दृष्टीने कशात आहे हे भारतीयत्व? अनेकत्वात एकत्व पाहण्याची, अनुभवण्याची जीवनदृष्टी म्हणजे भारतीय जीवन-दृष्टी असे त्यांचे गृहीत होते व या गृहीतावरच त्यांचा एकात्म मानववाद हा उभा आहे.

परंतु येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, एकात्म मानववादाची उभारणी भौतिक किंवा जडवादी दृष्टिकोनातूनही होऊ शकते. मार्क्सचे मानवदर्शन अशा जडवादावर आधारित आहे. उलट दीनदयाळ उपाध्याय हे भारताच्या आध्यात्मिक परंपरेचे वारसदार असल्याने चैतन्यवाद ही त्यांच्या एकात्मतेची मूळ धारणा आहे. हा जड-चैतन्यवाद तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात हजारो वर्षे चालत आलेला आहे व तो यापुढेही चालत राहणार आहे. सृष्टीच्या मुळाशी जडतत्त्व आहे की चैतन्याच्या स्फुरणातून सृष्टीची उत्पत्ती झालेली आहे, हे तत्त्वज्ञांना आजवर कधीही न सुटलेले कोडे आहे व शेवटी यापैकी कुठला तरी एक पक्ष श्रद्धेने किंवा संस्काराने स्वीकारून मानवी जीवनाविषयी, समाजधारणेविषयी विचार मांडावा लागतो. इतिहासात जडवादाचे प्राबल्य असणारे कालखंड आहेत तशीच चैतन्यवादाने भारलेली शतकेच्या शतकेही आहेत. घड्याळयाच्या लंबकाप्रमाणे मानवीसमाज या दोन टोकांमध्ये हेलकावत असतो असेही दाखवून देता येईल. भारतापुरते बोलायचे तर जडवादाचे प्राबल्य असणारा कालखंड तुलनेने थोडा आहे व चैतन्यवादाने जडवादावर नेहमीच विजय मिळविलेला आहे. या इतिहासक्रमाशी दीनदयाळांचा एकात्म मानवविचार जुळलेला आहे. अधिक काळपर्यंत एखादी विचारपद्धती, एखादे तत्त्वज्ञान, त्यातून निर्माण होणारी जीवनशैली एखाद्या देशावर प्रभाव गाजवीत राहिली तर ती त्या देशाचे वैशिष्ट्य, वेगळेपणाची खूण मानायला हरकत नाही. तसे चैतन्यवादाबाबत म्हणता येईल. जगातल्या सर्व देशात, सर्व काळात हा वाद जरी अस्तित्वात असला, त्याचे पुरस्कर्ते निर्माण झालेले असले तरी भारतातच या वादाची पाळेमुळे खूप खोलवर गेलेली आहेत, येथील जीवनावर या वादाची दाट छाया पसरून राहिलेली आहे, व वेदकाळापासून विवेकानंदांपर्यंत आणि गीतेपासून गांधीजींपर्यंत हा चैतन्यस्रोत अखंडपणे वाहात आलेला आहे. या प्रवाहाचेच 'एकात्म मानववाद' हे दीनदयाळकृत एक नवे संस्करण आहे, नवे नामकरण आहे. प्रवाह प्राचीन आहे, सनातन आहे. त्यातला आशय या दोन शब्दांत दीनदयाळांनी नेमका अंकित केला आहे. आपले 'भारतीयत्व' कशात आहे? 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' या जीवनदृष्टीत ते सामावलेले आहे. ज्यांनी ज्यांनी आपल्या मूळ अस्तित्वाचा, भारतीयत्वाचा शोध घेतला त्यांनी त्यांनी हे सत्य सांगितले. दीनदयाळ हेच सत्य चालू संदर्भात, विशेषतः सामाजिक-

पृष्ठ २३ वर

२५ सप्टेंबर

## पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्ताने....

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक अठरावा

३० सप्टेंबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□



साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□


## सप्रेम नमस्कार

□ दोन सप्टेंबरच्या कुटुंबनियोजन विशेषांकातील विजय परूळकर आणि शंकरराव चव्हाण यांची वक्तव्ये वाचली आणि त्या विरुद्ध निषेध नोंदविणे अत्यावश्यक आहे असे तीव्रतेने वाटले म्हणून हे पत्र पाठवत आहे. त्यांची मते धाडसी आहेत; पण म्हणून योग्य आहेत अशातला भाग नाही. त्यांनी आपल्या मताला समाजशास्त्रीय आधार दिलेला नाही. वरवर पहाता कॉमन–सेन्सला जे जाणवते, त्याच्या जोरावर इतक्या महत्त्वाच्या विषयावर ते बेधडकपणे विधाने करतात. सर्वसामान्य गरीब जनतेशी सुहृद संवाद त्यांनी साधलेला आहे असेही दिसत नाही. नाही तर गरीब लोक कुटुंबनियोजनात का मागे आहेत, याबद्दल डॉ. पटवर्धनांना जो अनुभव आला तो त्यांना आला असता.

कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम वेगाने रेटला नाही, तर पाच वर्षांनी माणसे माणसांना खायला उठतील हे चव्हाणांना 'अगदी स्पष्ट दिसतंय!' सध्याची उपासमार ही भरमसाठ लोकसंख्यावाढीमुळे आहे व ही लोकसंख्यावाढ कमी करणे हाच ह्या उपासमारीवरचा खरा तोडगा आहे असे त्यांना वाटते; पण हे म्हणणे खरे नाही. आतापर्यंत भारतातील आर्थिक विकास जनताभिमुख नव्हता, आजही नाही व म्हणून एवढे कारखाने निघून, शेतीतील उत्पादन वाढूनही विषमता कमी झालेली नाही. गरिबांना काम मिळत नाही, हे खरे उपासमारीचे कारण आहे आज ७६००० इंजिनिअर्स बेकार आहेत, कोटचवधी मजूर अर्धबेकार आहेत, सरकारी गुदामात १८० लाख टन धान्य पडून आहे, ग्रामीण विकासाच्या शेकडो योजना राबवण्याजोग्या आहेत, कारखान्यांमधील ४० टक्के उत्पादनक्षमता पडून आहे, (देशातील बाजारपेठेत मागणी नाही म्हणून कारखाने यंत्रसामुग्री निर्यात करत आहेत) तरी या सर्वांचा मेळ घालून जनताभिमुख विकास होत नाही हे खरे उपासमारीचे कारण आहे. बाजारू मागणीअभावी सरकारी गुदामात १८० लाख टन धान्य पडून राहिले नाही, तर एवढी उपासमार होणार नाही. उत्पादनशक्तींचा योग्य मेळ घालणे हे खरे उपासमारीवरचे उत्तर आहे. असा मेळ घालायचा म्हटला तर कोणाचे हितसंबंध उखडले जातील याचा शोध घेतला पाहिजे. तसा प्रयत्नसुद्धा चव्हाण करत नाहीत व आणीबाणी 'प्रामाणिकपणे' राबवणाऱ्याकडून तशी अपेक्षा करणेही चूक आहे. चव्हाणांचे जाऊ द्या, पण बड्यांच्या हितसंबंधाच्या खोडचात न अडकलेल्या परूळकरांनी 'माणूस'च्या वाचकांनी हा शोध घेतला पाहिजे. (कांता रणदिवेंचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल.)

परूळकर म्हणतील, देवी टोचून घेण्याची सक्ती का करत नाही? मग लोकांच्या भल्यासाठी कुटुंबनियोजन सक्तीचे का करू नये? देवी टोचून घेण्याची सक्ती केली नाही तर देवी फैलावून हाहा:कार माजेल; पण कुटुंबनियोजनाचा अभाव हे आजच्या उपासमारीचे खरे कारण नसल्याने कुटुंबनियोजनाची सक्ती करण्याने उपासमारीत फारसा फरक पडणार नाही. अगदी सक्ती करून जन्मसंख्येचा दर खाली आणला तरी बेकारीत लगेच काहीच फरक पडणार नाही. वीस वर्षांनी पडेल. चांगली नोकरी असलेल्यांना दोनच्या ऐवजी तीन मुले झाली तर ती उपाशी रहात नाहीत. म्हणजे बेकारी, अर्धबेकारी हे उपासमारीचे खरे कारण असताना, कुटुंबनियोजन हा उपासमारीवरचा तोडगा आहे, असे म्हणणे अशास्त्रीय आहे.

मग कुटुंब-नियोजनाचा कार्यक्रम मागे ढकलायचा का? तर मुळीच नाही. सुखी जीवनासाठी चाललेल्या माणसाच्या झगडचात कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाला मर्यादित पण निश्चित स्थान आहे. विरोध आहे तो 'उपासमारीवर तोडगा' असे लोकांना सांगत कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम रेटण्याला. कुटुंबनियोजनाबद्दलचा प्रचार खूप वाढवला पाहिजे, त्याबद्दल लोकशिक्षण जास्त वेगाने केले पाहिजे. मुलांना जन्म देण्यात स्त्रीचे सर्व आयुष्य जाऊ नये यासाठी मुख्यतः ह्या

कार्यक्रमाची तातडीने गरज आहे. गरीब पालकांना चारऐवजी दोनच मुले झाली, तर त्या घरातील उपासमार थोडी कमी होईल; पण मुळातच गरिबी आज अनावश्यक असतानाही ती का आहे याचा शोध घेतला पाहिजे. बालमृत्यूचे प्रमाण कमी न करता, म्हातारपणाची सोय न करता, सक्तीचे कुटुंबनियोजन करणे म्हणजे त्यांची क्रूर चेष्टा करणे आहे. केरळमध्ये बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी ५६·८ आहे व म्हणून जन्मसंख्येचे प्रमाण कमी म्हणजे ३१·१ आहे, तर उत्तरप्रदेशमध्ये बालमृत्यूचे प्रमाण जास्त म्हणजे १७८·७ असल्याने जन्मसंख्येचे प्रमाण जास्त म्हणजे ४५·६ आहे. एकूण सामाजिक मागासलेपण दूर होत असले तरच कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम यशस्वी होईल.

विकासाच्या आघाडीवरील अपयशावर पांघरूण घालण्यासाठी लोकसंख्यावाढीवर खापर फोडण्याची राज्यकर्त्यावर्गाची पद्धत नवीन नाही. अठराव्या शतकात दिवाळखोर अशा ब्रिटिश राजेशाहीने, एकोणिसाव्या शतकात भारतातील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हे शस्त्र वापरले होते. इथेही तसाच डाव खेळला जात आहे. त्याला 'माणूस', विजय परूळकर का बळी पडत आहेत ?

१५ सप्टेंबर डॉ. अनंत फडके, पुणे

□ 'दि. २ सप्टेंबरचा कुटुंब नियोजन विशेषांक दोन दिवसांत वाचून काढला, 'आता तरी वर्तले पाहिजे जाणपणे' हा श्री. विजय परूळकर यांचा लेख अत्यंत मोलाचा व तितकाच चिंतनीय वाटला.

'१९३१साली आमच्या तालुक्याचे पाटण गावची लोकसंख्या साडेतीन हजार होती. १९७१ मध्ये ती साडेनऊ हजार झाली. गावात एकही निर्वासित कुटुंब नाही. उलट १९४८ नंतर पठाण सावकार कुटुंबे पंधरा वीस निघून गेली. १९३२ मध्ये मुसलमान कुटुंबे अंदाजे २५ होती; आता ७५ झालीत. हे नमूद करणे इतकेच की, हिंदूंना नियोजन, मुसलमानांना माफी. परिणामी शहाणा हिंदू म्हणतो–दहा वर्षांत मुसलमान दुप्पट होतील, हिंदू कमी होतील म्हणून आम्ही नियोजन करणार नाही. तुम्ही बोंबलू नका ! सरकार षंढ आहे. आम्ही त्यास ताळ्यावर आणू. निरुनरच होणे भाग.

'श्री. परूळकरांनी लेखात स्वत:चे वैवाहिक जीवन अत्यंत स्पष्ट केले. हे फार मोलाचे कथन झालेने जवळपासच्या जाणकार मराठा स्त्रियांनी 'माणूस' मागून घेऊन सांघिक वाचन सुरू केले आहे, हे नमूद करणे अवश्य होय.

'हल्ली स्त्रीने शस्त्रक्रिया केलेस सरकार रु. ७० + ५० असे एकूण रु. १२०|– देते. त्यातून दलाल, सरपंच, तलाठी वगैरे लोक किमान रु. ५०|– मध्येच खाऊन त्या शस्त्रक्रिया केलेल्या अडाणी बाईस कसेबसे ७०|६० मिळतात. त्याऐवजी अशा बाईस बँकेमार्फत तात्काळ एक–दोन दिवसांत रुपये २५०|– रोख मिळावेत व काळजीपूर्वक ऑपरेशन झालेस करणारे खासगी व सरकारी डॉक्टरांना फक्त रु. १० किमान तीन–चार महिन्यांनी देणेत आलेस खेड्यात व गरीब कुटुंबात शेकडा १५|२० लोक पुढे येतीलच व डॉक्टरमंडळीही भीती टाकून कामास लागतील.

'पान १३ वर भारत सरकार दि. २|१०|७८ पासून प्रौढ साक्षरता प्रसारास ६०० कोटी रुपये खर्च करणार, हे वाचून धक्काच बसला. कदाचित या कामी करवाढ ही पुढे-मागे होणारच. त्यापेक्षा नसबंदी व प्रौढ साक्षरता असा एकूण खर्च दहा कोटी धरून त्यातले नसबंदीवर सात कोटी व प्रौढ साक्षरतेस तीन कोटी केलेस खूपच हिताचे राष्ट्रीय कार्य होईल.'

व्यं. अं. देशपांडे, पाटण

□ दि. ९ सप्टेंबरच्या 'माणूस' मध्ये आलेल्या दिल्लीच्या वार्तापत्रात 'लिमयांची पक्षपाती वृत्ती' या मथळ्याखाली छापलेला मजकूर विवादास्पद असून तो पक्षपाती वृत्तीतूनच वार्ताहराने लिहिलेला असावा, अशी दाट शंका येते.

'चरणसिंग हे जनता पक्षातील महत्त्वाचे मास लीडर आहेत' या लिमयांच्या मताशी कुणाचे प्रामाणिक मतभेद असू शकतात. त्याचप्रमाणे कुठल्याही घटक पक्षाला बाहेर ढकलून जनता पक्ष काबीज करण्याचा मनसुबा असणाऱ्या अन्य घटक पक्षांच्या दृष्टीने 'सहमती'च्या तत्त्वावर जनता पक्ष चालविण्याची लिमयांची सूचना अयोग्य असू शकते; पण लिमयांच्या विचारपद्धतीवर टीका करण्याच्या उत्साहात सत्याचा किंवा तथ्याचा विपर्यास करणे योग्य नाही.

कांतीभाईंच्या संदर्भात लिमयांनी पंतप्रधानांना पत्र लिहून ते वृत्तपत्रात फोडले, असा आरोप वार्ताहराने केला आहे. हा आरोप बिनबुडाचा आहे. हे पत्र पंतप्रधानांच्या गोटातूनच फोडण्यात आल्याचा निर्वाळा लिमयांनी दिला आहे.

औद्योगिक संबंधांबाबतचे विधेयक तसेच पक्षांतरविरोधी विधेयक संसदीय पक्षापुढे पुरेशी चर्चा होण्याच्या हेतूने ठेवले नाही. तसेच पक्षसभासदांचे मतही नीट अजमावले गेले नाही. पक्षांतरविरोधी विधेयकाबाबत सरकारने विरोधी पक्षांशी चर्चा केली नाही. तेव्हा ही दोन विधेयके संसदेत मांडण्याअगोदरच्या टप्प्यांवर लिमयेप्रभृतींनी पक्षीय पातळीवर योग्य मार्गाने विरोध केला; पण सरकारने या विरोधाला न जुमानता स्वपक्षीयांनाच पसंत नसलेली विधेयके सभागृहाला सादर करण्याचा हट्ट दाखविला. त्यामुळे स्व-पक्षाच्या विधेयकालाच विरोध करण्याचा अप्रिय प्रसंग लिमयेप्रभृतींवर ओढवला. आपल्याच पक्षातील विरोध दडपून टाकणाऱ्या तरतुदी या पक्षांतरविरोधी विधेयकात होत्या. इंदिरा गांधींनी चंद्रशेखर, धारिया, कृष्णकान्त यांच्यासारख्या विवेकशील विरोधकांवर वचक ठेवण्यासाठी अशा तरतुदी असलेले विधेयक तयार केले होते. तेच विधेयक जनता पक्षाने मांडले तर त्याला विरोध करणे चूक आहे का ?

आता लिमयांच्या राजिनाम्यासंबंधी. ९ ऑगस्ट रोजी लिमयांनी आपल्या सरचिटणीसपदाचा राजिनामा दिला आणि ताबडतोब पक्षातर्फे मिळालेली मोटारगाडीही परत केली. त्यांचा राजीनामा पक्षाने अजून स्वीकारलेला नाही; पण लिमयांपुरते पाहिले तर ते आता जनता पक्षाचे सरचिटणीस नाहीत, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. 'तीन महिन्यात वरिष्ठांचे मतभेद मिटले नाहीत तर मी राजिनामा देईन' अशी घोषणा सहा महिन्यांपूर्वी करून राजीनामा न देणाऱ्या वाजपेयींसारख्या ज्येष्ठ केंद्रीय मंत्र्यापेक्षा उक्तीत आणि कृतीत जवळीक साधण्यात मधू लिमये अधिक यशस्वी झाले आहेत, असे मला वाटते.

शिवाय 'मधू लिमयांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही', हे श्री. चंद्रशेखर यांचे स्पष्ट उद्गार लिमयांची बाजू बळकटच करतात.

१२ सप्टेंबर नंदू धनेश्वर, मुंबई

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# □ सुटीतील रोजगार योजना

गेल्या शुक्रवारी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनं राबविलेल्या सुटीतील रोजगार योजनेच्या या वर्षीच्या कामाचा समारोप-समारंभ पार पडला.

निदर्शनं, मोर्चे आणि आंदोलनं याबरोबरच काही रचनात्मक, विधायक वगैरे उपक्रमही विद्यार्थी यशस्वी करून दाखवतात, ही गोष्ट या उपक्रमातून स्पष्ट झाली आहे. शिवाय आपल्याच गरीब पण होतकरू विद्यार्थी मित्रांना मदत करण्यासाठी एक विद्यार्थी संघटना पुढे येते, हीही गोष्ट उल्लेखनीय आहे.

आजच्या तरुण पिढीबद्दल खूपच निराश झालेल्या तमाम सेवा-निवृत्तांना आणि मुख्य म्हणजे काही शिक्षणतज्ज्ञांना आशेचा एक किरण वाटावी अशी ही योजना मुंबईत १९६४ पासून सुरू झाली. अनेक गरीब विद्यार्थ्यांना एक शैक्षणिक वर्ष पार पडल्यानंतर दुसऱ्या वर्षी पुन्हा शिक्षण सुरू करताना अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. शिष्यवृत्ती आणि फी-सवलत मिळाली तर ठीकच, अन्यथा शिक्षणावर पाणी सोडण्याचीही वेळ येते. फीचा प्रश्न निकालात निघाला तरी नव्या वर्षासाठी वह्या-पुस्तकांचा खर्च, वसतिगृहाची फी, आणि इतर अनेक समस्या समोर उभ्या असतात. आर्थिक क्षमता नाही, एवढ्या एकाच कारणास्तव ज्यांना शिक्षण अर्धवट सोडावं लागतं अशा विद्यार्थ्यांना मदत व्हावी व त्यांना शिक्षण पूर्ण करता यावं, या उद्देशातून विद्यार्थी परिषदेनं ही योजना हाती घेतली.

प्रत्येक वर्षी विद्यापीठाच्या परीक्षांपूर्वी या योजनेतील नोकऱ्यांची ज्यांना गरज आहे अशा विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले जातात उत्पन्नाच्या गटानुसार आलेल्या अर्जांची पद्धतशीर छाननी केली जाते. मध्यमवर्गीय आणि अल्प उत्पन्न गटातल्या विद्यार्थ्यांना अर्थातच प्राधान्य देण्यात येतं. वणिज्य, विज्ञान आणि कला, अभियंत्रिकी या विद्याशाखांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची विभागणी केली जाते. याच सुमारास शहरातील काही उद्योगपती, बँका आणि अन्य संस्थांच्या संचालकांशी संपर्क साधण्यात येतो. या संस्थांमधील गरजेनुसार, कामाच्या स्वरूपानुसार उन्हाळ्याच्या सुटीच्या या कालावधीत किती जणांना त्या त्या ठिकाणी रोजगार मिळू शकेल, याचा अंदाज घेतला जातो.

वरवर कदाचित सोपं वाटेल; पण हे काम तसं खूप चिकाटीचं ! दोन-दोनदा, उद्योजक, संचालक यांना मुद्दाम भेटावं लागतं, उपक्रमाचं महत्त्व पटवून द्यावं लागतं. अशा वेळी टाळाटाळ करणारे, गोड गोड बोलून मागणी नाकारणारे असे अनेक नमुने मिळतात. जाहिरात द्यायला किंवा एखाद्या निधीसाठी मदत द्यायला उद्योजक किंवा व्यापारी तयार असतात; पण एखाद्याला नोकरी द्यायची म्हणजे गोष्ट सोपी नाही !

दरवर्षीच येणाऱ्या या सर्व अडचणींवर मात करून विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी या वर्षी १७५ विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून दिल्या. १९६४ साली ही योजना सुरू झाली तेव्हा फक्त १५ गरजू विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळाल्या होत्या; पण त्यानंतर उत्तरोत्तर ही संख्या वाढत आहे. १९७५ मध्ये तर ४७५ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला. त्यानंतर मात्र विद्यापीठाच्या परीक्षांच्या गोंधळाचा प्रतिकूल परिणाम या योजनेवर झाला. परीक्षांच्या तारखांची अनिश्चितता आणि त्यानंतर निकालाच्या तारखांचा घोळ यामुळे अनेक गरजू विद्यार्थी या योजनेचा फायदा घेऊ शकले नाहीत. या वर्षीही याच कारणामुळे नोकरदार विद्यार्थ्यांची संख्या पावणेदोनशेपेक्षा जास्त होऊ शकली नाही.

या योजनेचं ७७ ७८ या शैक्षणिक वर्षाचं काम संपत आल्यामुळे या योजनेचा लाभ झालेले विद्यार्थी, त्यांना नोकरी देणारे उद्योजक आणि परिषदेचे कार्यकर्ते यांचा एक स्नेहमेळावा दि. २२ रोजी पार पडला. मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून नगरविकासमंत्री श्री. हशू अडवानी उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितलेली एक महत्त्वाची गोष्ट अशी की, या सुटीतील रोजगार योजनेचे केवळ आर्थिक लाभच महत्त्वाचे नाहीत. या नोकऱ्यांमुळे विद्यार्थ्यांना जो अनुभव मिळतो, कायमची नोकरी करण्यापूर्वी जे प्रात्यक्षिक ज्ञान मिळतं तेही महत्त्वाचं आहे. त्यानंतर या योजनेतून नोकरी मिळालेल्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव या कार्यक्रमात सांगितले.

उद्योजकांपैकी कोणीतरी आपलेही अनुभव सांगतील अशी अपेक्षा होती; पण मुळात कार्यक्रमालाच कमी संख्येत उपस्थित राहून उद्योजकांनी आपली उदासीनताच दाखवली. आज–काल चांगले कार्यक्षम कर्मचारी मिळणे सोपे नाही. अशा स्थितीत या योजनेत विद्यार्थ्यांची चाचणी घेण्याच्या दृष्टीने उद्योजकांना विचार करता आला असता. विद्यार्थी प्रामाणिकपणे काम करतात का ? कामाचा वेग, दर्जा समाधानकारक असतो का ? मुलाखतीच्या वेळी उमेदवार कसे चुकतात इ. अनेक प्रश्नांबाबत, विधायक कामाला प्रोत्साहन देणाऱ्या उद्योगजकांकडून तरी मार्गदर्शनाची अपेक्षा होती.

विद्यार्थी परिषदेचा हा उपक्रम महाराष्ट्रात पुणे आणि नाशिक या शहरातूनही सुरू आहे. या समारंभात देण्यात आलेल्या माहितीनुसार अशीच एक रोजगार योजना मुंबई विद्यापीठातर्फेही चालवली जाते. सरकारी आश्रय असताना वास्तविक परिषदेच्या योजनेपेक्षाही अधिक यश विद्यापीठाला यायला हवं; पण नुसता आश्रय उपयोगाचा नाही. तळमळीनं आणि मनापासून काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांची तिथं गरज असते व त्यामुळंच मुंबई विद्यापीठाच्या या योजनेला अगदीच किरकोळ यश मिळालं आहे. अर्थात, साध्या परीक्षाही जिथं धडपणे होऊ शकत नाहीत, तिथं असले उपक्रम तरी कसे यशस्वी होतील ? □

## □ म्हैसाळच्या प्रयोगाची तामिळी आवृत्ती.

एका तामिळी वृत्तपत्रानं काही दिवसांपूर्वी एक बातमी प्रसिद्ध केली होती. त्यात म्हटलं होतं की, मद्रासच्या एका झोपडपट्टीतील हरिजन स्त्रियांच्या सहकारी संस्थेनं निर्माण केलेली काही सुंदर चित्रं, वस्त्रप्रावरणं, व काही कलावस्तू यांची युरोपातील रोषका कलासंग्रहालय आणि गटेनबर्ग, कोपन हेगन इ. शहरांतील प्रदर्शन संस्थांनी आयात करण्याची तयारी दर्शवली आहे व लवकरच ह्या वस्तू त्या त्या ठिकाणी पाठवल्या जातील.

आश्चर्यकारक पण अत्यंत स्वागतार्ह अशा या घटनेवर अधिक प्रकाश टाकणारी माहिती अलीकडेच प्रसिद्ध झाली आहे. मधुकरराव देवलांनी जो प्रयोग म्हैसाळला केला तोच प्रयोग, तेच सहकाराचं रसायन वापरून म्हैसाळपासून खूप दूर, मद्रासच्या एका झोपडपट्टीत हरिजन महिलांनी यशस्वी करून दाखवला आहे. शेजारून चालताना मुठीत नाक धरून चालण्याव्यतिरिक्त झोपडपट्टीच्या अस्तित्वाची-मुख्य म्हणजे तिथल्या जीवनाची-कोणतीच दखल न घेणाऱ्या तुम्हा-आम्हा सगळ्यांनाच लक्ष्यवेधी वाटेल आणि कदाचित प्रेरकही ठरेल अशा ही घटना आहे. म्हणूनच वृत्तपत्रीय माहिती संकलित करून सविस्तर लिहीत आहे.

ही कहाणी आहे न्यू वॉशरमन पेट या मद्रास शहराच्या उत्तर भागातील एका झोपडपट्टीची. झोपडपट्टीतील वस्ती प्रामुख्याने रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांची. हमाल, हातगाडीवाले, फेरीवाले असेही अनेकजण या झोपडपट्टीत राहातात, प्रत्येक कुटुंबात सरासरी चार ते पाच मुलं ! रोजची मजुरी साहजिकच खूपच अपुरी पडायची आणि अर्धपोटी किंवा उपाशी राहिल्यानं अनेक रात्री झोपेविना घालवाव्या लागायच्या.

१९६५ च्या एप्रिलमध्ये याच झोपडपट्टीत काही समाजसेवकांनी कामाला सुरुवात केली. इथल्या महिला मिळवत्या झाल्या तर आर्थिक गरज काही प्रमाणात पूर्ण होऊ शकेल, या विचारातून बाटिक छपाईचा कुटीरोद्योग सुरू करण्याचा कल्पना या समाजसेविकांनी मांडला. किंचित नाखुशीनं का होईना, पण झोपडपट्टीतील अठरा गृहिणींनी या कल्पनेला मान्यता दिली. बाटिक केंद्रावरील प्रशिक्षण घेऊन या महिलांनी सुरुवात केली. मेणाचा वापर करून आकर्षक नक्षीकाम करण्याचीही कला ह्या महिलांनी लवकरच आत्मसात केली. स्वतःचो गाव, तिथला निसर्ग, प्राणी, पक्षी अशा विविध स्वरूपात व्यक्त होणारे या आशिक्षित महिलांच्या अस्सल प्रतिभेचे आविष्कार हळूहळू लोकप्रिय होत गले.

या अस्सल लोककलेला मागणी वाढली आणि या महिला मिळवत्या बनल्या. पुढे पुढे रोजंदारी संपली आणि १०० रु. पगारावर त्या नोकरीत कायम झाल्या.

पण यांच्या हाती पैसा आलेला पहाताच सावकारांची ये-जा सुरू झाली. पगाराच्या दिवशीच या सावकारांचा ससेमिरा सुरू होऊ लागला. शक्य होईल त्या प्रमाणात हप्तेबंदीने कर्ज फेडण्यासही या महिला तयार झाल्या; पण तरीही कर्ज आणि कर्जामागून वाढत जाणारं व्याज यांच्या फेऱ्यातून हरिजन महिलांची सुटका कित्येक दिवस होतच नव्हती.

जागरूक समाजसेविकांनी हाही प्रश्न सोडविला ! एका विदेशी सेवासंस्थेच्या सहाय्यातून एक कर्जनिवारण निधी उभारण्यात आला आणि त्यातून कर्जफेडीसाठी काही अटींवर कर्जदारांना मदत मिळू लागली. या समाजसेविकांनी स्थानिक सावकारांचे हे अनधिकृत कर्जव्यवहार जेव्हा पोलिसांच्या नजरेस आणून दिले तेव्हा त्यानंतर कायदेशीर कारवायाही झाल्या. परिणामतः शंभर रुपयांच्या कर्जावर बारा रुपये दरमहा व्याज आकारून कर्जदारांना नागविण्याचे सावकारी व्यवहार आता बरेच कमी झाले आहेत.

बाटिक केंद्राचं काम दिवसेंदिवस वाढतच होतं. चित्रकलेच्या जोडीला जुजबी लेखन-वाचनाचे वर्गही सुरू झाले. आपण शिकू शकतो, आपण चित्रं काढू शकतो, त्यांना बाजारात चांगली किंमत मिळू शकते हे या महिलांना समजू लागलं तेव्हाच आपण म्हणजे 'पराची' (परके, हरिजन) म्हणून आपण कनिष्ठ, ही भावना नष्ट होत गेली. दहा बारा वर्षांच्या या तपश्चर्येनंतर या पराचींनाच स्वतःमधल्या सामर्थ्याचा शोध लागला आहे.

आज या बाटिक केंद्रात कलाकार, शिंपी, छपाईकामगार, सुतार, कारकून असे एकूण ८० जण आहेत. यातील काही मोजकी कामं सोडली तर अन्य सर्व कामे हरिजन महिलाच करतात हे विशेष ! युरोप-अमेरिकेतील अनेक ठिकाणी या केंद्रातून गेल्या वर्षी सुमारे सहा लाख रुपये किमतीच्या कलावस्तू निर्यात केल्या गेल्या. या वस्तूंमध्ये हातरुमाल, कुर्ता, सलवार, जर्किन्स, पलंगपोस अशा शेकडो प्रकारच्या, बाटिकपद्धतीने छापलेल्या वस्तूंचा समावेश आहे झोपडपट्टीतल्या स्त्रियांची ही लोककला विदेशांतील मोठमोठ्या दुकानात आज दिमाखानं मिरवीत असेल !

गेल्या फेब्रुवारी महिन्यात या बाटिक केंद्राचं एका सहकारी संस्थेत अधिकृतरीत्या रूपांतर केल गेलं. कामगार-कलाकारांपासून झाडूवाल्यांपर्यंत सर्वांचं प्रतिनिधित्व या संस्थेच्या संचालकमंडळात आहे. खरेदी-विक्रीचे सारे व्यवहार या संस्थेचे कामगारच पहातात. संस्थेनं एक कायम स्वरूपी कर्जनिवारणनिधी उभारला आहे. कर्जफेडीला मदत करण्याऐवजी आता खऱ्या गरजूंना कर्जवाटपाची कामगिरीच या निधिसंकलनातून पार पाडली जाईल.

झोपडपट्टीतील काम करणारी मंडळी मुंबई किंवा पुण्यातही आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी किंवा अनेक युवक संघटनासुद्धा झोपडपट्ट्यांमधून काही ना काही सेवाकार्य करताना दिसतात. सातत्याने आणि तळमळीने काम करणाऱ्या सर्वांनाच मद्रासमधील हा प्रयोग मार्गदर्शक ठरेल. सहकारी चळवळीचं हे यश, म्हणूनच महत्त्वाचं आहे. □

## □ पॉलिस्टर खादी

मागच्याच आठवड्यात पंतप्रधान मोरारजी देसाई पुण्याला आले होते, तेव्हा काही सर्वोदयी कार्यकर्त्यांनी त्यांची मुद्दाम भेट घेऊन खादीमध्ये पॉलिस्टर धागा मिसळण्याच्या संकल्पित कल्पनेला तात्त्विक विरोध व्यक्त केला होता. ही कल्पना अनैतिक आहे, हा

मलपृष्ठ २ वर


या फुलाला उमलू द्या
मुलाच्या शारीरिक आणि मानसिक विकासाच्या दृष्टीने पहिली तीन वर्षे फार नाजूक असतात. त्यावेळी त्याला आपल्या वात्सल्याची व संगोपनाची नितांत गरज असते.
म्हणूनच या काळात दुसऱ्या मुलास जन्म देऊन त्याला यापासून वंचित करू नका. आणि मातेच्या आरोग्याच्या दृष्टीने पण दोन मुलांत तीन वर्षांचे अंतर आवश्यक आहे.
स्त्रीयांसाठी आय.यू.डी. आणि गोळ्या आणि पुरुषांसाठी निरोध
मोफत मार्गदर्शन आणि सेवेसाठी
जवळच्या आरोग्य केंद्रांत जा
davp 78/160

# अवती-भवती

शिरीष सहस्रबुद्धे

भारत हा विविधतासंपन्न देश आहे--असली काही तरी शाळकरी सुरवात करून सर्वांना माहीत असलेल्या गोष्टीच नव्यानं सांगायचा इरादा नाही, तर मराठवाड्यातल्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक धर्म-पंथ-जमातींच्या परस्पर संदर्भात जे विचारमंथन सुरू झालंय त्याच्याशी सुसंगत असे विचार दुसऱ्या एका जुन्या प्रश्नाच्या संबंधात मांडायचेत, रशिदुद्दिन खान यांच्या एका 'साप्ताहिक' लेखाच्या अनुरोधानं !

प्रश्न आहे तो भारतीय मुस्लिमांचा आणि उर्दूचा. सहा कोटीहून थोडेसे अधिकच लोक--ज्यांना तरीही अल्पसंख्यांक म्हटलं जातं--आणि त्यांची भाषा. आता हिंदूंपेक्षा मुसलमानांची संख्या कमीच; किती तरी कमी, तेव्हा त्यांना अल्पसंख्यांक म्हटलं तर त्यात काय चुकलं? असा गणिती प्रश्न कदाचित काहींच्या डोक्यात येईल. त्याला उत्तर असं की, संख्येतल्या फरकावर प्रश्न सुटणं अवलंबून असतं, तर प्रश्न निर्माणच झाले नसते. ज्याला आपण मुसलमानांचा प्रश्न म्हणून संबोधतो तो उद्भवण्याचं मूळ कारणच हे आहे की, हिंदूंपेक्षा संख्येनं कमी असला तरी, हिंदू वगळता हा एकच अखिल भारतीय पातळीवरचा समाज आज या देशात नांदतोय्. हेच पहा ना :--

| धर्म | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| १. हिंदू | ४५·३२ कोटी | ८२·७२ |
| (अ) सवर्ण हिंदू | ३३·५३ ,, | ६१·२२ |
| (ब) अनुसूचित जाती | ८·०० ,, | १४·६० |
| (क) अनुसूचित जमाती | ३·८० ,, | ६·९० |
| २. मुस्लिम | ६·१४ ,, | ११·२१ |
| ३. ख्रिश्चन | १·४२ ,, | २·६० |
| ४. शीख | १·०३ ,, | १·८९ |
| ५. बुद्ध | ०·३८ ,, | ०·७० |
| ६. जैन | ०·२६ ,, | ०·४७ |
| ७. इतर धर्म (पारशी, ज्यू, इ. इ) | ०·२१ ,, | ०·४० |

(सर्व माहिती १९७१ च्या शिरगणतीनुसार)

या अकरा-सव्वा अकरा कोटी मुस्लिम समाजगटाची भौगोलिक विभागणी ज्या पद्धतीनं झालीय्, तीही त्यांच्या समस्येचा विचार करण्याच्या दृष्टीनं महत्त्वाची ठरावी :--

| राज्य | राज्याच्या लोकसंख्येतील मुस्लिम टक्केवारी |
|---|---|
| (अ) बहुसंख्यांक समाजगट म्हणून | |
| १. जम्मू-काश्मीर | ६५·८५ |
| २. लक्षद्वीप | ९४·३७ |
| (ब) दुसऱ्या क्रमांकाचा मोठा समाजगट म्हणून | |
| ३. आसाम | २४·०३ |
| ४. पश्चिम बंगाल | २०·४६ |
| ५. उत्तर प्रदेश | १५·४८ |
| ६. बिहार | १३·४८ |
| ७. कर्नाटक | १०·६३ |
| ८. गुजराथ | ८·४२ |
| ९. महाराष्ट्र | ८·४० |
| १०. आंध्र प्रदेश | ८·०९ |
| ११. राजस्थान | ६·९० |
| १२. त्रिपुरा | ६·६८ |
| १३. मध्य प्रदेश | ४.३६ |
| १४. हिमाचल प्रदेश | १.४५ |
| (क) तिसऱ्या क्रमांकाचा मोठा समाजगट म्हणून | |
| १५. केरळ | १९·५० |
| १६. मणिपूर | ६·६१ |
| १७. तामिळनाडू | ५·११ |
| १८. हरयाना | ४·०४ |
| १९. ओरिसा | १·४९ |
| २०. अंदमान-निकोबार | १०·१२ |
| २१. दिल्ली | ६·४७ |
| २२. पाँडिचेरी | ६·१८ |
| २३. गोवा | ३·७६ |

तेव्हा मुस्लिम समाज दोन राज्यांत बहुसंख्यांक आहे, तर इतर बारा राज्यांमध्ये सर्वांत मोठा अल्पसंख्य समाज आहे--मुद्दा हाच की देशाच्या एकूण लोकसंख्येच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असणं आणि देशातल्या एकतृतियांश राज्यात तरी अस्तित्व असणं, हे दोन निकष मानले तर' हिंदू आणि मुस्लिम हे दोनच समाजगट, अखिल भारतीय पातळीवरचे आहेत. हे दोनच समाज असे आहेत की, जे भारतभर प्रादेशिकत:, भाषिकत:, सांस्कृतिकदृष्टचा, पंथदृष्टचा

पृष्ठ १९ वर

# समर्थ नेतृत्व

## आपल्या लोकशाहीपुढील प्रश्न

वा. दा. रानडे

पंतप्रधान मोरारजीभाईंच्या पुणे–भेटीत विचारवंतांच्या (इंटेलेक्च्युअल्स या इंग्रजी शब्दास बुद्धिवंतांपेक्षा विचारवंत हा शब्द मला अधिक योग्य वाटतो ) एका शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली. पंधरा मिनिटांच्या चर्चेत त्यांच्या प्रश्नांना मोरारजीभाईंनी दिलेली उत्तरे अत्यंत असमाधानकारक होती अशी तक्रार शिष्टमंडळाचे एक सभासद आमदार ग. प्र. प्रधान यांनी एका निवेदनात केली आहे.

पंतप्रधानांची उत्तरे असमाधानकारक कशी आहेत याची काही उदाहरणेही त्यांनी दिली आहेत. तातडीच्या प्रश्नांवर तातडीने उपाय योजायला हवेत. आपली काळाबरोबर शर्यत चालू आहे. या शिष्टमंडळाच्या प्रश्नास मोरारजीभाईंनी उत्तर दिले, 'काळ अनंत आहे.' मोरारजीभाईंची उत्तरे देण्याची पद्धति आता सुपरिचित झालेली आहे. प्रश्नकर्त्यांचे शब्द पकडून ते उत्तर देत असतात. शिष्टमंडळाने काळाबरोबरच्या शर्यतीचा उल्लेख करून आपणास त्याची जाणीव नाही हे सूचित करावे हे पंतप्रधानांना रुचले नसावे, म्हणून काळाच्या अनंतत्वाची जाणीव त्यांनी आपल्या उत्तरात शिष्टमंडळास करून दिली. उत्तर असमाधानकारक आहे; पण त्यात अनपेक्षित काही नव्हते. लोकसभा–निवडणुकीतील जनता पक्षाच्या प्रचंड विजयानंतर नवी चैतन्यदायी राजवट सुरू होईल, अशी लोकांची अपेक्षा होती; ती पुरी झालेली नाही याकडे शिष्टमंडळाने लक्ष वेधले तेव्हा हा दोष लोकांचा आहे, आम्ही सर्व बरोबर करीत आहोत, अशा अर्थाचे उत्तर पंतप्रधानांनी दिले. जनता पक्षासाठी किमान एक वर्ष पूर्ण वेळ काम करायला तयार असणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना आता उत्साह वाटत नाही, हे शिष्टमंडळाने पंतप्रधानांच्या निदर्शनास आणले; पण पंतप्रधानांना अशा कार्यकर्त्यांची माहितीच नाही असे त्यांच्या उत्तरावरून दिसून आले. शिष्टमंडळाला या चर्चेत पंतप्रधानांची जी प्रतिमा दिसली ती एका आत्मसंतुष्ट पंतप्रधानाची होती. सत्तरी ओलांडलेल्या ज्येष्ठ नेत्यांनी सत्तास्थाने सोडायला हवीत असे प्रा. प्रधानांना अलीकडे वाटू लागले होते. मोरारजीभाईंच्या चर्चेनंतर त्यांना तसे लौकर घडावे असे वाटू लागले आहे.

प्रा. प्रधान यांचे निवेदन वाचल्यावर काही प्रश्न उपस्थित होतात. जनता सरकारने अपेक्षाभंग केला त्याबद्दल सत्तरी ओलांडलेल्या ज्येष्ठ नेत्यांना जबाबदार धरणे कितपत योग्य होईल? मोरारजीभाईंची पंतप्रधानपदी झालेली निवड ही एक तडजोड होती. चरणसिंग आणि जगजीवनराम यांचेही या पदासाठी प्रयत्न होते. नेता–निवडीचे काम आचार्य कृपलानी व जयप्रकाश नारायण यांच्यावर सोपविण्यात आले. त्यांनी मोरारजीभाईंची निवड केली व नंतर लोकसभेतील जनता पक्षाने त्यावर शिक्कामोर्तब केले. मोरारजीभाईंना नेता निवडताना त्यांच्या नेतृत्वाच्या मर्यादांची आचार्य कृपलानी व जयप्रकाश यांना कल्पना नव्हती असे कसे म्हणता येईल? या मर्यादा माहीत असूनही उपलब्ध नेत्यात तेच अधिक योग्य म्हणून त्यांची निवड झाली. वृद्धत्वाच्या निकषाची आज आठवण झालेल्यांनी हा निकष त्याच वेळी लावण्याचा आग्रह का धरला नाही? तसे केले असते तर पक्षात सुरुवातीपासूनच झगडे निर्माण झाले असते. मोरारजीभाई, चरणसिंग आणि जगजीवनबाबू हे नेते वृद्ध असले तरी जनता पक्षाच्या विजयात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता, हे नाकारता येणार नाही. तेव्हा पहिल्या जनता मंत्रिमंडळात त्यांचे स्थान अटळच होते. त्यांनीच स्वेच्छेने निवृत्त होण्याचे ठरविले असते तर गोष्ट निराळी! तरुणांनीच नेतृत्व करावे, आम्ही यापुढे फक्त सल्लागार म्हणून काम करू अशी भूमिका त्यांनी घ्यावयास हवी होती; पण सत्ताकांक्षेच्या मोहापासून दूर रहाण्याचा मनाचा मोठेपणा या तिन्ही नेत्यांजवळ नव्हता हे तर मान्य करायला हवेच; पण त्यांना दूर सारून आपल्या हाती नेतृत्व घेण्याचे धैर्य तरुण आणि मध्यमवयीन नेतृत्वात नव्हते हेही मान्य करायला हवे. केवळ ज्येष्ठ नेत्यांना दोष देणे बरोबर नाही. आमचे तरुण व मध्यमवयीन नेतृत्वसुद्धा थिटे पडले.

केंद्र सरकारच्या असमाधानकारक कामगिरीबद्दल पंतप्रधान या नात्याने मोरारजीभाईंना जबाबदार धरता येईल; पण जेथे जनता पक्षाच्या हाती सत्ता आहे त्या राज्य सरकारांच्या कामगिरीचे काय? तेथील मुख्यमंत्री तर केंद्र सरकारमधील ज्येष्ठ मंत्र्यांप्रमाणे वृद्ध नव्हते ना? जनता सरकारचा कार्यक्रम त्यांनी धडाक्याने का अमलात आणू नये? त्यांचे हात कोणी रोखले आहेत? पण निरनिराळ्या राज्यांतील जनता सरकार काँग्रेस सरकारापेक्षा आपली निराळी व चांगली प्रतिमा निर्माण करण्यात यशस्वी झालेली नाहीत. प्रश्न नेतृत्वाच्या, वृद्धपणाचा किंवा तरुणपणाचा नसून नेतृत्वगुणांचा आहे. त्यात जनता पक्षाचे केंद्र व राज्य पातळीवरीलही नेतृत्व कमी पडत आहे. जमीनसुधारणांच्या अंमलबजावणीचे बाबतीत हे प्रकर्षाने दिसून आले.

आणि जी स्थिती सरकारी पातळीवरील नेतृत्वाची तीच पक्षपातळीवरील नेतृत्वाची आहे. पक्षसंघटनेच्या पातळीवरील अपयशाला हे नेतृत्व मुख्यतः जबाबदार आहे. सतरा महिन्यांच्या काळात रीतसर सभासदनोंदणी करून संघटनात्मक निवडणुका घेणे, सभासदनियुक्त पदाधिकारी व समित्या

पृष्ठ १८ वर

# तारापूर : धोक्याच्या वळणावर उभे असलेले अणुवीजकेंद्र

प्रा. श्री. स. ओगले, वरोडा, जि. चंद्रपूर

गेल्या शतकातील अत्यंत भयानक असा वैज्ञानिक शोध कोणता असेल तर तो 'अणुविस्फोट' हा होय. १९३४–३५ साली इटलीतील विख्यात शास्त्रज्ञ इंडिगो फर्मी यांनी असे दाखवून दिले की, युरेनिअमच्या संयुक्तांना न्यूट्रॉन्सचा मारा केल्यास नवे किरणोत्सर्गी अणू तयार होतात. ह्याचाच आधार घेऊन १९३९ साली ओटो हान व एफ. स्ट्रासमन ह्या जर्मन रसायनशास्त्रज्ञांनी अणुविघटनाची क्रिया प्रयोगशाळेत घडवून आणली. त्यांनी असे पाहिले की, एखाद्या व्रात्य मुलाने एखाद्या मडक्याला जोराने दगड फेकून मारला असता त्या मडक्याचे जवळपास दोन समान मोठे भाग होतात व त्याचबरोबर बारीक बारीक तुकडेही लांबवर उडतात. त्याचप्रमाणे युरेनिअम–२३५ (U–235) ह्या अणूला न्यूट्रॉन्सने मारा केला तर हा अणू दोन भागात विभागतो व त्याचबरोबर परत न्यूट्रॉन्स बाहेर पडतात. ह्याशिवाय प्रचंड प्रमाणात शक्ती बाहेर पडते. प्रत्येक युरेनिअम (२३५) च्या विस्फोटाबरोबर २०°×१०⁶ इलेक्ट्रॉन व्होल्टस एवढी शक्ती बाहेर पडते किंवा १ ग्रॅम युरेनिअम (२३५) च्या अणूंचा विस्फोट केल्यानंतर मिळणारी शक्ती ही २·५ टन कोळशापासून मिळणाऱ्या शक्तीएवढी असते. ह्यावरून अणूस्फोटातील शक्तीची आपल्याला कल्पना येईल. ते दुसऱ्या महायुद्धाचे दिवस होते. एकीकडून जर्मनी, जपान व इटली इ. देश होते तर दुसरीकडून ब्रिटन, रशिया व अमेरिका ही प्रमुख राष्ट्रे होती. जर्मनी तसा क्षीण होत आला होता; परंतु जपान मात्र ह्या सगळ्यांच्या नाकात दम आणत होता. तेव्हा ही शेवटची गोळी म्हणून अमेरिकेने अणुविस्फोट किंवा अणुविघटन ह्या शोधाचा उपयोग केला व अणुबॉम्ब तयार केला व ५ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानजवळील नागासाकी व हिरोशिमा ह्या बेटावर स्फोट करून जपानला शरणागता स्वीकारायला लावली. सर्व जगाला हादरा बसला ! अणुस्फोटानंतर हजारो लोक मृत्युमुखी पडले, लाखो विकलांग झाले ! येवढेच कशाला ? त्यानंतरच्या कित्येक पिढ्या किरणोत्सर्गाने अपंग व क्षीण निपजल्या ! सर्व जगात अमेरिकेचा धिःकार झाला. अणुबॉम्ब टाकणारे वैमानिक वेडे झाले. खुद्द अमेरिकेतच अमेरिकेची निर्भत्सना झाली. 'अणुबॉम्ब' हा नवा संहारक राक्षस निर्माण झाला. ह्या राक्षसाचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी कसा करता येईल ह्याचाही अभ्यास सुरू झाला आणि त्यात मानवास यशही आले. आज हीच अणुशक्ती मानवाची विविध तऱ्हेने सेवा करीत आहे. ह्याचा मुख्य उपयोग अणुशक्तीपासून 'वीजनिर्मिती' हा होय. आज भारतातही दोन अणुवीज केंद्रे कार्यरत आहेत. ही केंद्रे कुठे उभी करावयाची असा प्रश्न उभा राहिला तेव्हा त्याची स्थान पश्चिम अथवा दक्षिण भारतात असावी, असा निष्कर्ष काढण्यात आला कारण कोळसा व तेल ह्यांच्या भारतात असलेल्या खाणी बहुतांशी पूर्व भारतात असल्याने त्या भागात औष्णिक विद्युत केंद्रे स्थापन करून वीजनिर्मिती करणे सुलभ होते. म्हणून पहिले अणुवीज केंद्र मुंबईपासून १०० कि. मी. अंतरावर तारापूर येथे सुरू करण्यात आले, तर दुसरे राजस्थानमध्ये कोटा येथे सुरू करण्यात आले. आणखीही चार केंद्रे निरनिराळ्या ठिकाणी स्थापन होत आहेत; परंतु तारापूर व कोटा येथील केंद्रे सध्या वीज-निर्मिती करीत आहेत. ह्या केंद्रासोबतच ही केंद्रे चालविण्यासाठी आवश्यक असलेली 'जड पाणी' (Heavy Water) इत्यादी वस्तुनिर्मितिकेंद्रेही ह्याच भागात चालू करण्यात आली. ही केंद्रे सुरू करताना फार भव्य दिव्य उद्दिष्टे भारतासमोर होती; सद्यःस्थितीत मात्र ही अणुवीज केंद्रे व संलग्न वस्तुनिर्मिति केंद्रे एका धोक्याच्या वळणावर उभी आहेत. विशेषकरून १९ मे १९७४ रोजी राजस्थानात पोखरण येथे भारताने केलेल्या पहिल्या अणुस्फोटानंतर 'तारापूर' येथील अमेरिकेच्या मदतीने व सल्ल्याने चाललेले वीजकेंद्र अत्यंत अनिश्चिततेच्या स्थितीत चालू आहे. ८ ऑगस्ट १९६३ रोजी भारत व अमेरिका ह्यांच्यात वाटाघाटी होऊन तारापूर येथे भारतातील पहिले अणुवीज केंद्र उभारण्याची योजना तयार झाली. विख्यात अमेरिकन कंपनी 'इंटर नॅशनल जनरल इलेक्ट्रिक कंपनी' व 'बेचेल पॉवर' ह्यांना हे केंद्र स्थापन करण्याचे काम देण्यात आले. अमेरिकेने त्याच्या यु. एस. अेड्. ह्या योजनेअंतर्गत ६० कोटी डॉलर्सचे दीर्घ मुदतीचे कर्जही भारताला दिले. हे केंद्र अव्याहतपणे सुरू राहण्यासाठी युरेनिअम– २३५ ने युक्त इंधन ह्या केंद्रास आजन्म देण्याचा करारही केला; पण हे सर्व करताना अमेरिकेने काही अटीही भारतावर लादल्या. ह्या अटीनुसार ह्या वीज केंद्रातील कुठलेही उपकरण अथवा संयंत्र वीजनिर्मितीशिवाय अन्यत्र कुठल्याही कारणासाठी उपयोगात आणता येणार नाही. तसेच ह्या वीज केंद्राच्या कुठल्याही भागाची, कोणत्याही वेळी संपूर्ण तपासणी करण्याचे अधिकार अमेरिकेस राहतील. ह्या केंद्रात वीजनिर्मितीनंतर तयार होणारे 'प्लुटोनियम' तारापूर येथेच ठेवावे लागेल व ते परत विकत घेण्याचा पहिला हक्क अमेरिकेस राहील. तारापूर येथील ह्या वीज केंद्रात दोन रिॲक्टर्स असून त्यांची प्रत्येकी उत्पादनक्षमता २०० मेगॅवॅटची आहे. ह्या रिॲक्टर्सचे आयुष्य २५ वर्षांचे समजले जाते. १९६४ मध्ये ह्या रिॲक्टरनिर्मितीचे कार्य सुरू झाले व १ फेब्रुवारी १९६९ रोजी पहिल्या व २७ फेब्रुवारी १९६९ रोजी दुसऱ्या रिॲक्टरमधून व्यापारी तत्त्वावर वीज-उत्पादन सुरू झालेले आहे. ह्या अणुवीज केंद्राच्या कराराप्रमाणे १९७४ पर्यंत अमेरिका दरवर्षी १७

ते २० टन सक्षम युरेनिअम देत आलेली आहे; परंतु १८ मे १९७४ रोजी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांच्या इशाऱ्याने झालेल्या भारताच्या पहिल्या भूमिगत अणुस्फोटानंतर अमेरिकेने ह्या मदतीचा हात आखडता घेतला आहे. ह्या अणुस्फोटासाठी आवश्यक असलेले युरेनिअम अथवा प्लुटोनिअम तारापूर केंद्रातून घेतल्याचा अमेरिकेस दाट संशय आहे. वास्तविक ते तसे नाही, असे भारताने वारंवार सांगितले आहे. त्याशिवाय हा स्फोट शांततापूर्वक कारणांसाठी करण्यात आला आहे, हेही आवर्जून सांगण्यात आले; परंतु हा स्फोट झाल्यानंतर १९७५ सालीच अमेरिकेने युरेनिअम पाठविण्यात चालढकल सुरू केली व शेवटी अत्यंत नाखुषीने ते पाठविले. १९७६ ची खेपही अशीच उशीरा म्हणजे मार्च १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यावर पाठविली. आताही गेल्या वर्षीची युरेनिअमची खेप मुरारजी देसाई यांच्या पुन: अणुविस्फोट न करण्याच्या आश्वासनानंतर व १९७४ साली झालेल्या अणुविस्फोटाची निर्भत्सना केल्यानंतर प्रे. कार्टर यांनी ७·६ टन व १६·७ टन असे युरेनिअमचे दोन हप्ते मान्य केले व हे हप्ते भारतात पाठविण्यासाठी जहाजे तयार आहेत; परंतु तीही अमेरिकेतील संयुक्त राज्य परमाणू नियमसंबंधी आयोग ( United States Nuclear Regularity Commission ) या अर्ध–न्यायिक आयोगाच्या परवानगीची वाट पहात आहेत. असे म्हणतात, सध्या भारतापाशी असलेला युरेनिअमचा साठा जास्तीत जास्त १९७९ मार्च/एप्रिलपर्यंत पुरू शकेल व नंतर तारापूर वीज केंद्र चालविणे शक्य होईल. उपरोक्त परमाणू-नियमसंबंधी आयोगाच्या युरेनिअम भारतात पाठविण्याला परवानगी देण्यासाठी आतापर्यंत दोन बैठकी 'कोरम' नसल्याने पुढे ढकलण्यात आल्या आहेत. ह्या साऱ्यामागे भारताने 'आण्विक अस्त्र विस्तार रोध' ( Naclear Non-Proliferation Treaty ) करारावर सही करावी, ह्यासाठी अमेरिका मानसिक दबाव टाकीत असल्याचे बोलले जाते. भारताचे पंतप्रधान श्री. मुरारजी देसाई यांनी शांततेसाठीदेखील परत अणुविस्फोट न करण्याचे भारताचे धोरण असल्याची ग्वाही अमेरिकेस दिली असली तरी 'आण्विक अस्त्र विस्तार रोध' ह्या एकतर्फी करारावर सही करण्याचे साफ नाकारले आहे. उलट असा करारच करायचा झाला तर साऱ्याच अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी ह्यावर सही करावी व आपले अण्वस्त्रसाठे आधी संपूर्णपणे नष्ट करावेत व त्यांच्या अस्त्रसाठ्यांची खुली तपासणी करायची कोणालाही परवानगी असावी, असे ठणकावून सांगितले आहे. ह्या गोष्टीस मात्र अमेरिकेची परवानगी नाही. त्यांना रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन ही आधीच अण्वस्त्रधारी झालेल्या राष्ट्रांशिवाय इतर राष्ट्रे अण्वस्त्रधारी व त्यायोगे शक्तिमान होऊ नयेत असे वाटते. ह्या साऱ्यामुळेच अमेरिका भारतावर आज नाराज आहे व ह्यामुळेच तारापूरला आजन्म युरेनिअम देण्याचे वचन देऊनही आज अमेरिका वचनपूर्तीची चालढकल करीत आहे. तुमची सारी 'अणुसंशोधन केंद्रे' आम्हास तपासू द्या, अशी विचित्र अटही अमेरिका टाकीत आहे. येवढेच नाही तर नेमक्या ह्याच वेळी बडोद्याजवळील अणुवीजनिर्मितीस आवश्यक असलेल्या 'जड पाणी' प्रकल्पात विस्फोट होऊन तो प्रकल्प आज बंद पडलेला आहे. आणखी एक-दोन वर्षे तो सुरू होण्याची शक्यता नाही, असे समजते. राजस्थानात अणुविद्युत केंद्रात संप व हिंसाचार घडत आहेत. हैद्राबादच्या 'परमाणु–इंधन संस्थान' चे काम बंद पडलेले आहे. ह्या अनुषंगिक घटनांच्या योगायोगात अमेरिकेचा तर हात नाही ना, अशा शंकाही घेतल्या जात आहेत. ह्या साऱ्यामागे अमेरिकेच्या साम्राज्यशाहीचे व भारताला आपल्या अंगठ्याखाली दाबून ठेवण्याच्या वृत्तीचे प्रदर्शन होत आहे. ह्या संकटांमुळे तारापूर वीज केंद्राचे विद्युत–उत्पादन ७७–७८ ह्या वर्षात ७० टक्क्यांनी घटलेले आहे. अमेरिकेला सुबुद्धी होऊन तिने युरेनिअमचा पुरवठा केल्यास तारापूर वीज केंद्र जिवंत राहणार आहे, नाही तर भारताला काही तरी पर्यायी व्यवस्था करावी लागेल. युरेनिअमचे साठे भारतात जारीने शोधावे लागतील किंवा 'बॉम्बे हाय' मधून निघणाऱ्या नैसर्गिक वायू व देशांतर्गत मिळणारा कोळसा ह्यांच्या साह्याने विद्युत–निर्मिती करावी लागेल. नाही तर तारापूर-मध्येच युरेनिअमच्या उपयोगानंतर निर्माण झालेल्या प्लुटोनिअमपासून परत सशक्त युरेनिअम मिळविण्याची प्रक्रिया शोधून काढावी लागेल. सुदैवाने अशा प्लुटोनिअमचा बराच मोठा साठा आज तारापूरला जमा झालेला आहे व अमेरिकेच्या मदतीनेच ह्या प्लुटोनियमचे युरेनिअममध्ये रूपांतर करणारा Trombay Plutonium Reproducing Plant ही आज तयार आहे. फक्त त्याला अमेरिकेची हिरवी झेंडी मिळालेली नाही. आता फक्त पाह्यचे आहे की, अमेरिका वेळेवर युरेनिअम पाठविते की, भारत आपला स्वाभिमान शाबूत ठेवून, अमेरिकेची बंधने झुगारून स्वतःच्या हिंमतीवर पावले टाकणार ? अमेरिकेची सुबुद्धी वा भारताची स्वाभिमानी जिद्दी वृत्ती ह्यावरच आज तारापूरचे भविष्य अवलंबून आहे. □

ताजा कलम :

अमेरिका १९८३ पर्यंत युरेनिअमच्या पुरवठा करील, असे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी जाहीर केले आहे.

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरंदरे

# कॅम्प डेव्हिडचे यश ? अगा जे घडलेचि नाही

आता हा शेवटचा प्रयत्न, हा आणखी एकच, अगदी शेवटचा, हा मात्र अगदी अगदी शेवटचा, असे म्हणत परत एकदा इस्राएल आणि इजिप्त शांततेचा शोध घेण्यासाठी आंधळी कोशिंबीर खेळायला लागले. या वेळेला कार्टरही त्याला न शोभणारा सुतकी चेहरा करून त्यांच्यात सामील झाला. डोंगर पोखरून उंदीर काढायचा अशा या खेळाचा उद्देश. त्यासाठी चेहेरे गंभीर केले की खेळाची खुमारी वाढते, अशी सादात, बेगिन आणि कार्टर तिघांचीही प्रामाणिक समजूत.

६ सप्टेंबरला अमेरिकेत कॅम्प डेव्हिड या सुंदर ठिकाणी ही शिखर परिषद सुरू झाली. सहा आणि सात तारखेला सादात आणि बेगिन या दोघांनी अमेरिकेच्या आणि त्यांच्या देशांच्या शिष्टमंडळापुढे लांबलचक भाषणे केली. दरम्यान कार्टर नोट्स घेत बसलेला होता. सहा आणि सात तारखेला अशा रीतीने दोन्ही नेत्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. (वस्तुतः मध्यपूर्वेच्या प्रत्येक अभ्यासकाला अखेरच्या कलमापर्यंत दोन्ही देशांच्या भूमिका माहीत आहेत.) तदनंतर कार्टरने यात भाग घ्यायला सुरुवात केली. कारण द्विपक्षीय वाटाघाटी नेहमीप्रमाणे पॅलेस्टाइनच्या प्रश्नावर आणि वेस्ट बँकवर झपाट्याने होत असलेल्या इस्राएली वसाहतींवर अडल्या. आठ तारखेपासून सतत त्रिपक्षीय वाटाघाटी चालू होत्या. दोन्ही देशांतील (इजिप्त आणि इस्राएल) लोकांच्या आशा-आकांक्षा या वाटाघाटींवर केंद्रित झालेल्या होत्या. कोणताही तोडगा निघत नाही अशा बातम्या कॅम्प डेव्हिडहून यायला लागल्या, सादात तर दोन वेळा सामान बांधून निघाला होता. त्याला कार्टरने वधूपित्याच्या अजीजीने दादापुता करून थोपविले. बारा तारखेला तर शांततेचा कांचनमृग शेवटची हुलकावणी दाखविणार, असं वाटायला लागलं. अखेर कार्टरने अब्रू पणाला लावून दोघांनाही काही पावलं मागं घ्यायला लावली आणि अखेर अठरा सप्टेंबरपर्यंत रेंगाळलेली ही शिखर परिषद नाट्यमयरीत्या प्रचंड यश मिळाल्याचा गाजावाजा करीत संपली ! भावनांचा खेळ वजा टाकता बाकी फारच कमी राहिलेली आहे. कार्टरचे गेल्या दोन वर्षांतील एकूण अपयश झाकण्यासाठी थोड्या-फार प्रमाणात याचा उपयोग होईल; पण परिस्थितीत मूलतः फारच थोडा फरक पडलेला आहे. याचे प्रमुख कारण असे की, इजिप्त आणि इस्राएल या दोघांच्याच हातात मध्यपूर्वेची परिस्थिती नियंत्रित करणे राहिलेले नाही. जॉर्डन, सीरिया, पॅलेस्टीनिअन्स आणि पॅलेस्टाइन लिबरेशन ऑर्गनायझेशन हे त्यातील काही प्रमुख घटक आहेत. इस्राएलचे या प्रत्येकाशी असणारे निरनिराळ्या पातळ्यांवरचे संबंध व त्यांची परस्परांतील गुंतागुंत यांनी ह्या प्रश्नाचे पैलू अधिक बिकट केलेले आहेत.

सादातने नोव्हेंबरमध्ये इस्राएलला भेट दिलेली होती. त्या भेटीनंतर, तेवढ्या नाही तरी त्या भेटीच्या आसपासची महत्त्वाची हीच शिखर परिषद होती. त्या वेळी पॅलेस्टिनी लोकांचा प्रश्न अस्तित्वात आहे, एवढे तरी बेगिनने कबूल केले होते आणि सादातने इतर अरब राष्ट्रांनी जे मान्य केले नव्हते, ते इस्राएलचे अस्तित्व भेटीने मान्य करून टाकले; पण यापुढे काहीच प्रगती होऊ शकलेली नव्हती, ती आजही फार झाली आहे असे म्हणता येणार नाही.

## प्रमुख प्रश्न

वाटाघाटीचे जाते परत परत जिथे अडत होते तो वेस्ट बँक ह्या वसाहतींचा प्रश्न होय. जॉर्डन आणि इस्राएल यांच्या संबंधातील ह्या प्रमुख प्रश्न. या ठिकाणी नऊ हजार इस्राएली व पंधरा लाख अरब आहेत. सध्या हे इस्राएलच्याच ताब्याखाली आहे. या वेस्ट बँकेला प्रथम स्वयंशासन देऊन मग जॉर्डनच्या हवाली करावे, असा नोव्हेंबरमध्ये तोडगा सुचविण्यात आला होता; पण इस्राएलला हे मान्य नव्हते. तसेच गाझा समुद्रधुनी आणि गोलन टेकड्या या भागातील इस्राएली फौजेचे व इस्राएली शासनाचे स्वरूप हे वादग्रस्त प्रश्न होते.

इजिप्तची प्रमुख कुतरओढ ज्यामुळे होते ती गोष्ट म्हणजे सादातला इस्राएल आणि इजिप्त या दोघातच केवळ द्विपक्षीय करार होतो आहे, असे दाखवायाचे नाही. मध्यपूर्वेतील बाकी राष्ट्रांनी जरी या बोलण्यावर बहिष्कार टाकलेला असला तरी चिरस्थायी शांततेसाठी त्यांना वगळणे अशक्यच आहे. त्यामुळे आपण अरब राष्ट्रांच्या वतीने आणि इजिप्तच्या वतीने वाटाघाटी करीत आहोत, असा सादातचा पवित्रा असतो. दुर्दैवाने या दोन भूमिका फारशा पूरक नसल्याने सादातने स्वतःची परिस्थिती नाजूक करून घेतलेली आहे. सिनाईचे वाळवंट हा इजिप्तचा प्रदेश. इस्राएलने ६७चे युद्धात व्यापलेला या सिनाईचा भाग सोडावा, ही सादातची इजिप्तचा अध्यक्ष या नात्याने होणारी मागणी आणि वेस्ट बँक, गाझा आणि गोलन टेकड्या यांच्यावरचा ताबा सोडावा, ही मध्यपूर्वेच्या अरबांचा प्रतिनिधी या नात्याने होणारी मागणी, या दोन्ही एका वेळी इस्राएलला मान्य होणे अशक्यच. त्यामुळे इस्राएलने धूर्तपणे इजिप्तच्या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले आणि बाकीच्यांकडे सोयिस्कर दुर्लक्ष केले. त्यामुळे सादात एकटा पडून इस्राएलच्या अधिक जवळ येईल व पुढे-मागे अरबांची संयुक्त फळी फोडायला उपयोगी पडेल, असा हिशेब यामागे असावा.

## कॅम्प डेव्हिडचा ठराव

एकूण चार गोष्टी मान्य करण्यात आल्या. त्यात प्रमुख म्हणजे पाच वर्षांत वेस्ट बँक आणि गाझाला स्वयंशासन देण्यात येईल. गंमत अशी की, या सगळ्यात प्रमुख कलमाची खिल्ली २१ सप्टेंबरला बेगिनने

न्यूयॉर्कमध्येच उडविली. त्या अन्वये इस्राएली सैन्य पाच वर्षांनंतरही तिथे राहीलच, असे त्याचे म्हणणे आहे. स्वयंशासन बोंबललेच !

दुसरी गोष्ट म्हणजे 'विशिष्ट' ठिकाणी इस्राएल लष्कर कायम ठेवणार. ही विशिष्ट ठिकाणे अजून निश्चित करण्यात आलेली नाहीत.

तिसरे कलम असे की, जॉर्डनला या वाटाघाटीत भाग घेण्यासाठी पाचारण करण्यात येईल. परंतु जॉर्डनने २० सप्टेंबरलाच आपण हा करार ओळखत नसल्याचे जाहीर करून त्यावर बोळा फिरविला आहे.

चौथा भाग म्हणजे राजनैतिक संबंध प्रस्थापित करणे. जॉर्डन आणि पॅलेस्टिनी लोक यांच्याशी प्रामुख्याने हे संबंध प्रस्थापित करायचे, असे म्हटले आहे. त्यात जॉर्डनने नाट लावलाच, पॅलेस्टिनी तर सादातचेच तोंड बघणार नाही, असा विडा उचलून बसले आहेत ! ते इस्राएलला ओळखतच नसल्याने राजनैतिक संबंधांचा प्रश्नच येत नाही.

अशा रीतीने कॅम्प डेव्हिड हा एक नवा अपयशी प्रयत्न म्हणून मध्यपूर्वेच्या इतिहासात नमूद होणार !

## परिणाम

याचे परिणाम पहाण्यासारखे आहेत. सौदी अरेबियाचा प्रिन्स खलिद, जॉर्डनचा किंग हुसेन आणि सीरियाचा हाफेझ असद हे सादातचे वैयक्तिक संबंध चांगले असणारे प्रमुख राष्ट्रप्रमुख व तोही कॅम्प डेव्हिडवरून सतत टेलिफोन करून त्यांची मते अजमावीत होता; पण या साऱ्याचा काही उपयोग न होता इस्राएलशी कडक धोरण ठेवणाऱ्या अल्जिरिया, लिबिया, द. येमेन आणि PLO यांनी नवी परिषदही सुरू केली. मुळात लिबियाचा गडाफी आणि सादात यांच्यामधून विस्तवही जात नाही, त्यात PLO च्या अराफतचा बोलण्यातून त्याला वगळल्याचा राग. त्यामुळे हे सगळे सादातने फक्त द्रोह साधला, असे म्हणत आहेत.

त्यातल्या त्यात सौदीकडूनच ठीक प्रतिक्रिया झाली. त्यांनी वर्मावर नेमके बोट ठेवले. आपण स्वत: या कराराशी संबंध ठेवित नाही, हे जाहीर करतानाच सादातने इजिप्तचा लाभ पहाताना जे केले ते इजिप्तचे अंतर्गत प्रश्न या दृष्टीने पाहून त्यावर आपण प्रतिक्रिया व्यक्त करू इच्छित नाही, असे जाहीर केले. कुवेतनेही सुरात सूर मिसळला.

दरवर्षी एक अब्ज डॉलर्स इजिप्तमध्ये ओढूनही इजिप्त अजून स्वत:च्या पायावर उभा राहू शकत नाही. हे अब्जावधि डॉलर्स अमेरिकेचे आहेत. ती मदत आता वाढेल आणि इजिप्तचा स्वत:चा संरक्षणखर्च कमी होईल. हे दोन इजिप्तचे लगतचे फायदे.

इजिप्तच्या परराष्ट्रमंत्र्याने परिषद संपायच्या दोन दिवसच आधी राजीनामा दिला. नोव्हेंबरला सादातने इस्राएल–भेट जाहीर केल्यावर इस्माइल फाहमी आणि मोहम्मद रिआद या दोघांनी लागोपाठ राजीनामे दिले होते.

स्वत:चे भवितव्य पणाला लावणे हा प्रकार सादात आणि बेगिन दोघांच्याही बाबतीत थोड्या-फार प्रमाणात लागू आहे. सादातने अन्तर्गत विरोध, प्रेस दडपलेले आहेत; पण विद्यार्थ्यांकडून विरोध होण्याची शक्यता आहे.

बेगिनचे लिकुड मंत्रिमंडळ ही मुळातच आवळ्या–भोपळ्याची मोट आहे. ती टिकेल ही शक्यता जरी जास्त असली तरी क्नेसेट, इस्राएली पार्लमेंट दोन आठवड्यात कॅम्प डेव्हिड ठराव मंजूर करताना काय दुरुस्त्या सुचवील, हे लक्षणीय आहे.

शांततेचा करार येत्या तीन महिन्यांत करायचा एवढेच वस्तुत: या बैठकीत निश्चित रूपाने ठरले; पण ते दिसते एवढे सोपे नाही. सादात बहुश: एकाकी पडलेला आहे.

रशियाने दक्षिण येमेनमार्फत आपले पाय पसरायला सुरुवात केली आहे. स्वत:ला अनुकूल अशी धोरणे राबवून घेऊन अमेरिकेला कॅम्प डेव्हिडच्या तथाकथित यशाने मिळालेली प्रतिष्ठा हिरावून घेणे हे रशियाचे नजीकचे धोरण असणार. त्याचा दृश्य परिणाम आता दिसेलच. □


**ZENITH STEEL PIPES AND INDUSTRIES LIMITED**

**Makers of Finest Quality Steel Pipes, Industrial Knives and Special Steels,**

**Regd. Office** : Moti Mahal, 195, Churchgate Reclamation, BOMBAY 400 020.


**Telephone** : 294445 – Telex : 011 – 2458
Grams : ZENPIPES

**Works** : KHOPOLI 410 203, Dist. KULABA, Maharashtra.

**Telephones** : 321, 322 & 394 – Grams : ZENPIPES

A REPUTATION BASED ON COMMITMENT TO QUALITY.

## जोशी–अभ्यंकर हत्याकांड



# एका वार्ताहराची दैनंदिनी

**वरुण भिडे**

१ नोव्हेंबर १९७६

आज आठवड्याची सुट्टी होती; पण घरी बसून काय करणार म्हणून ऑफिसात गेलो गोपाळराव ('विशाल सह्याद्री'चे वार्ताहर गो. कृ. पटवर्धन) म्हणाले, 'विश्व हॉटेलच्या मागे तीन खून झाले आहेत, चला !' माझी कल्पना झाली की, गोपाळरावांना 'विश्व'मध्ये जाऊन चहा घेण्याचा मूड आला असावा; पण ते विजयानगर कॉलनीकडे निघाले. या वस्तीत तीन खून पडण्याची शक्यता नसल्याने दोन खून आणि एक आत्महत्या अशी शंका आली.

जोशी बंगल्यात तिघांची प्रेतं तीन ठिकाणी पडलेली दिसली. मारहाण–जखमांच्या खुणा नव्हत्या. बहुधा विष घेऊन जीव दिला असं वाटलं. आश्चर्य असं की, इतक्या मोठ्या बंगल्याचे रूप कळाहीन होतं. अतिशय दैन्यावस्था दिसत होती. दारिद्र्याला कंटाळून जीव दिला असावा. तसं XXX या पोलिस अधिकाऱ्याला सांगितलं. त्याचं तसंच मत होतं. सुट्टी होती तरी डाकआवृत्तीसाठी 'कुटुंबाची आत्महत्या' अशी बातमी दिली. सर्वांनीच तशी बातमी दिली.

संध्याकाळी सबइन्स्पेक्टर सुभाष जोशी जीपमधून जाताना दिसले. त्यांनी गळ्याभोवती आवळल्याची खूण करून जीभ बाहेर काढली. त्या खुणेच्या अनुरोधाने जोशी बंगल्याकडे गेलो. पोस्टमार्टेममध्ये तिघांचा गळा आवळल्याने खून झाल्याचं आढळल्याचं समजलं म्हणून बातमी दुरुस्त केली. हे जोशी वा. रा. ढवळे यांचे जावई होते.

२ नोव्हेंबर १९७६

जोशी–प्रकरणाची बातमी XXX या वर्तमानपत्राने 'आत्महत्या' म्हणूनच दिली आहे. सकाळी मजकूर दिल्यावर पुन्हा त्यांच्या बातमीदाराने चौकशीच केलेली नसावी. इतकी ढिलाई बरी नव्हे. अजून तपास नाही.

८ नोव्हेंबर १९७६

जोशी–प्रकरणाचे धागेदोरे विश्व किंवा कल्पना हॉटेलात सापडतील असं मी पोलिसांना म्हणालो होतो. त्यानुसार सी. आय. डी. मधील लोक दोन्ही हॉटेलांत दिसतात. मात्र ही शंका माझ्या मनात का आली, हे आठवतच नाही.

२२ नोव्हेंबर १९७६

शंकरशेठ रस्त्यावरील बाफना नावाच्या एका बाईच्या बंगल्यात हात-पाय बांधून, तोंडात बोळे कोंबून दरोडा घालण्याचा प्रयत्न झाला. सय्यद मुनीरच्या मते हा प्रकार जोशी–प्रकरणाशी साम्य असणारा आहे. मला तसं वाटत नाही. सॅलिसबरी पार्कात झालेल्या प्रकरणासारखे असणार. पोलिसही तसंच म्हणतात.

१ डिसेम्बर १९७६

जोशी–प्रकरणाला महिना झाला म्हणून हुल्याळकरांना (सहाय्यक

पोलिस आयुक्त) फोन केला आणि म्हणालो, 'काय साहेब, छापू का अजून तपास नाही असे?' आज ६ ते १२ डेस्कड्यूटी होती. त्या वेळात कुणाचा तरी फोन आला. कँपात प्रचंड आग लागली आहे. आगीच्या शेजारीच स्पिरिटचं गोडाउन आहे. मुनीर ('सकाळ'चे वार्ताहर सय्यद मुनीर) कटाळा करू लागला म्हणून आम्ही दोघेही फोटोग्राफर थोपटेंसह गेलो. प्रचंड आग होती. माहिती घेऊन आलो तो किशोर ('सकाळ'चे सहसंपादक किशोर कुलकर्णी) गंभीर चेहरा करून बसला होता. तो म्हणाला, 'भांडारकर रस्त्यावरील बंगल्यात पाच खून पडले आहेत, असा डॉक्टर ××× चा फोन होता.' डॉक्टर ××× काही तरी अतिरंजित सांगत असेल; पण चौकशी केलेली बरी, म्हणून पोलिसांना फोन केले. बंगल्याचा पत्ता मिळाला. काही तरी भयंकर आहे एवढंच समजलं. मुनीर आगीची बातमी लिहीत असल्याने मी स्वतःच जाण्यास निघालो. वाटेत डॉक्टर ××× थांबला होता. त्याला गाडीत घेतलं आणि बंगल्याजवळ पोचलो. हा बंगला मला माहीत होता. अभ्यंकर रहातात. त्यांचे वडील व्हरांड्यात बसलेले मी पूर्वी पाहिले होते. कडक बंदोबस्त होता. कोणी बोलत नव्हतं. हुल्याळकर एका रात्रीत पाच वर्षांनी म्हातारे झाल्यासारखे दिसत होते. जोशींच्या बंगल्यात येत होता तसाच, अत्तराचा वास येथेही येत होता. बंगला तसा कोपऱ्यावर होता.

रात्री सव्वा वाजता कमिशनर चौगळ बाहेर आले. त्यांनी 'पाच व्यक्ती मृतावस्थेत सापडल्या. सर्वांचे खून झाले आहेत. अभ्यंकरांचे वडील, आई, मुलगा, मुलगी आणि मोलकरीण असे ते पाच लोक आहेत,' इतकीच माहिती दिली.

तसाच परत निघालो. गुडलक हॉटेलमधून किशोरला फोनवर मिळालेली माहिती सांगितली. अधिक तपशील मिळाल्यावर कळवीन. आपल्याकडे काशीनाथशास्त्रींचा फोटो आहे तो वापरा, असंही सांगितलं. गुडलकमध्ये जमलेल्या गर्दीतील काही लोकांनी काय झालं, कसं झालं याची चौकशी केली. खुनाला वाचा फुटतेच, पोलिस शोधतीलच, जोशी–प्रकरणाशी साम्य आहे म्हणजे आश्चर्यच आहे, वगैरे कॉमेंटस् केल्या. (पुढे आरोपींना अटक झाल्यावर माझ्या लक्षात आलं की, गुडलकमध्ये भेटलेले लोक ते हेच. त्यांच्यापैकी मुनावर शा याला पाहिल्याचं आठवत नाही. बाकीचे तिथे नेहमीच्या पाहण्यातले असल्याने लक्षात होते. अर्थात ही बाब पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाची असेल असं मला वाटलं नाही, म्हणून पोलिसांना सांगितलं नाही, चार्जशीट दाखल झाल्यावर सांगितलं. हे आधी का सांगितलं नाही, म्हणून पोलिस चिडले होते.)

अधिक माहिती मिळत नाही, असं पाहून पुन्हा ऑफिसात आलो. तिथून अशोक जोशीला फोन केला. त्याला अभ्यंकरांबद्दल फारशी माहिती नव्हती. म्हणून डॉ. मनोहर आपटयांना फोन केला. त्यांनी फक्त ग. का. अभ्यंकरांची माहिती दिली.

जरा वेळाने लाटयांचा फोन आला. मला एकदम आठवलं, आपटे-लाटे हे कारखान्याचे भागीदार आहेत आणि ते अभ्यंकरांचे मामा आहेत. फोनवर झालेला संवाद असा,

...'सकाळ ऑफिस का?'...

...'हो'...

...'मी मेजर जनरल लाटे बोलतोय. मला एक माहिती समजली आहे. त्याबद्दल खात्री करून घ्यायची आहे.'...

...'साहेब; जरा त्रास देतो; पण आपल्या भगिनी मिसेस अभ्यंकर, त्यांचं नाव काय?'...

...'इंदिराबाई'...

...'आणि जी. के. अभ्यंकरांची मुलं?'...

...'मुलगा धनंजय आणि मुलगी जाई किंवा जुई'...

...'घरातील मोलकरीण?'...

...'सखुबाई. अहो, पण या माणसांचं झालं आहे काय?'...

...'साहेब, मला वाईट बातमी सांगायला दुःख होतंय; पण या पाचही माणसांचे खून झाले आहेत.'...

नावं मिळाल्यावर बातमी पूर्ण झाली. तोपर्यंत फोटोग्राफर थोपटयांनी काशीनाथशास्त्रींचा फोटो शोधून ठेवला होता.

बातमी दिल्यावर पुन्हा भांडारकर रस्त्याकडे गेलो. पहाटे पाच-पर्यंत थांबून पुढे काहीच तपासाची चिन्हं दिसेनात. म्हणून मंडईत आलो. तिथे सर्व वर्तमानपत्रं आली होती. सर्वांत अचूक बातमी, तीदेखील फोटोसह फक्त 'सकाळ'मध्येच होती. मंडईतील हॉटेलात जमलेले लोक 'काही म्हणा 'सकाळ' तो 'सकाळ', अशी तारीफ करत होते. त्यामुळं मला मूठभर मांस वाढल्यासारखं वाटलं. १ डिसेंबर हा माझा 'सकाळ'च्या नोकरीचा पहिलाच दिवस होता. जोशी प्रकरण मी 'विशाल सह्याद्रि'मध्ये असताना घडले होते. दोन वर्तमानपत्रात अभ्यंकर खुनाची बातमीच नव्हती. ××× या आमच्याशी स्पर्धा असणाऱ्या वर्तमानपत्राने 'कर्नल अभ्यंकर यांच्या बंगल्यात खून', 'प्रेते रक्ताच्या थारोळ्यात' असं लिहिलं होतं. अभ्यंकर कधीच सैन्याधिकारी नव्हते; पण बेधडक चुकीची बातमी दिली होती. याच मंडळींनी पूर्वी जोशी प्रकरण 'आत्महत्या' असल्याचं छापलं होतं.

२ डिसेंबर ७६

सकाळपर्यंत जागरण झाल्याने झोपलो होतो. साडेनऊ वाजण्याच्या सुमाराला राजू (सकाळचे वार्ताहर राजीव साबडे) आला. मला बोलवायला का आला नाहीस, म्हणून चिडला होता. नंतर दोघे अभ्यंकर बंगल्यापाशी गेलो. पोलिसांनी सर्व बंगला दाखवला. आतील परिस्थिती पाहिली. बाहेर अशोक, आपटे आणि इतर मंडळी होती अशोक म्हणाला, 'तुझा फोन आला तेव्हा घरात मी एकटाच, वीज गेलेली. नंतर झोपच येईना. थंडीत घाम फुटला होता. उजाडल्यावर इथेच आलो.'

दुपारी सर्व प्रेतं हालवली. संध्याकाळी लक्ष्मीरोडवरील त्यांच्या घरी नेऊन पुढे वैकुंठावर नेली. वैकुंठावर तोबा गर्दी होती. माणसाला उत्कंठा असू शकते; पण पुढे घुसण्यासाठी रेटारेटी, मारामारी हा प्रकार विकृतीचा म्हणावा की काय!

अभ्यंकरांनी हातात गोवरी घेऊन आई, वडील, मुलगा, मुलगी आणि मोलकरीण या पाच जणांना अग्नी दिला आणि सर्व चिता धडधडून पेटल्या. अभ्यंकरांचं मनोधैर्य आणि खंबीरपणा वेगळाच. असा धीराचा माणूस असणं कठीणच.

आज आणखी एक जाणवलं. ते म्हणजे, जोशी-लोखंडे प्रकाशनाचे सुरेंद्र जोशी अभ्यंकर बंगल्याचं बारकाईने निरीक्षण करीत होते. जोशी बंगल्यात तेच सर्वप्रथम गेले होते. त्यांनी या प्रकरणातील

व्यक्ती पाहिल्या असाव्यात. कसल्या तरी भीतीमुळे ते बोलत नसावेत, असं वाटतं.

८ डिसेंबर ७६

जोशी-लोखंडे प्रकाशनाचे सुरेंद्र जोशी आज मरण पावले. चांगला उंचनिंच, तगडा माणूस एकदम गेला, हे खरंच वाटत नाही. हार्ट ॲटॅकनं मृत्यू आला, असं म्हणतात. आश्चर्याची गोष्ट अशी की, इतक्या रात्री झालेला मृत्यू अत्यंत तातडीने वर्तमानपत्रांना कळवण्याचं अगत्य काय? मला तर असं वाटतं की, जोशी-अभ्यंकर खुनाला जबाबदार असणाऱ्या व्यक्ती सुरेंद्र जोशींनी पाहिल्या असाव्यात; परंतु भीतीने ते बोलत नसावेत. जोशींना माहिती आहे हे गुन्हेगारांना माहिती असावं, ते धमक्या देत असतील त्याच भीतीमुळे हार्ट अटॅक आला असेल.

९ डिसेंबर ७६

सुरेंद्र जोशींच्या मृत्यूची बातमी सर्व वर्तमानपत्रांत आली आहे. रात्री दीड वाजता झालेला मृत्यू सर्व वर्तमानपत्रांना कळवण्याची घाई काय? मला तर असं वाटलं की, 'गेला तो माणूस गेला, आता इतरांच्या जिवाला धोका नको. 'हार्ट अटॅक' म्हटलं की संबंधित गुन्हेगार या घराकडे मोहरा वळवणार नाहीत,' अशी कुटुंबियांची भावना असेल. अर्थात हे विचारणार कोणाला आणि खात्री कशी करणार? आज अनेक जण म्हणाले की, जोशींना धमकी देणारे फोन येत होते. खरं-खोटं देव आणि जोशीच जाणोत!

१२ डिसेंबर ७६

गेले दहा-बारा दिवस पुणं शहर रात्री भयाण वाटतं. दहा वाजले नाहीत तोच सामसूम. रात्री काम संपवून घरी जाताना अशी भीती वाटते की, बोलायची सोय नाही. ज्या गुन्हेगारांच्या भीतीने सर्वजण लटलटा कापत आहेत, त्यांची भीती वाटत नाही. कारण त्यांची गुन्ह्याची पद्धत वेगळीच आहे. वाटसरूला मारणार नाहीत; पण समजा दोन-चार चोरटे आले आणि हाणमार करून सायकल हिसकावून नेली, आपण ठो ठो बोंबललो तरी कोणी दार उघडून बाहेर येणार नाही. त्यातून सायकल दुसऱ्याची म्हणजे नुसती सायकल जाणार नाही. नुकसानभरपाई द्यावी लागेल.

आणखी एक गमत म्हणजे रात्रीची वर्दळ कमी झाल्याने सायकलीवरून जाताना वाटेत पन्नास कुत्री भुंकतात. एखाद्याने लचका तोडला म्हणजे ह्या पोटात चौदा इंजेक्शने! इतक्या सुधारणा झाल्या आहेत; पण या चौदा इंजेक्शनांना सोपा पर्याय का काढीत नाहीत कोण जाणे.

सध्या आणखी एक गंमत चालू आहेच. रात्री घरी जाणाऱ्या माणसाला कोणी दारच उघडत नाही. प्रभुदेसाईला ('केसरी'चे वार्ताहर) त्याच्या बायकोने रात्री उशीर झाल्यावर घरातच घेतलं नाही. रात्री कुडकुडत परत ऑफिसला येऊन झोपला म्हणे! काल एक माणूस पहाटे नागनाथ पारापाशी फूटपाथवर चकरा मारताना दिसला. बाजूला बॅग ठेवली होती. चौकशी केली तर म्हणाला, मुंबईहून पहाटे पाहुणा म्हणून आलोय. घरातले लोक म्हणतात, उजाडल्याशिवाय दारच उघडणार नाही. असो. एकूण धमाल चालू आहे.

१५ डिसेंबर ७६

प्रसिद्धीची हाव हा प्रकार विलक्षणच आहे. आज दिवसभरात निरनिराळ्या मंडळांचे कार्यकर्ते बातम्या घेऊन आले होते. 'आम्ही आमच्या भागात गस्त घालीत आहोत. ह्या लोकांच्या नेतृत्वाखाली गस्त चालू आहे. तेवढी नावं छापा.' नांवं छापून येण्यासाठी काय वाटेल त्या प्रकाराची संधी लोक शोधत असतात.

२८ डिसेंबर ७६

एक जानेवारीला पुण्यात कर्फ्यू आहे, अशी जबरदस्त अफवा पसरली आहे. पोलिसांनी अफवेचा इन्कार केला; पण लोकांच्या मनातून ही भीती जायला तयार नाही. एक तारखेची भीती निर्माण व्हायला मीही जबाबदार आहे. 'दोन्ही खुनातील साम्य' अशी चौकट मी छापली होती. त्यात 'दोन्ही खून एक तारखेला झाले,' असं वाक्य होतं. खरं म्हणजे जोशी खून एक नोव्हेंबरला झालाच नव्हता. ३१ ऑक्टोबरला झालेला खून एक तारखेला समजला इतकंच; पण चुकून छापल्या गेलेल्या त्या विधानाचा काय जबरदस्त परिणाम झाला आहे!

'जोशी–अभ्यंकर हत्याकांड' ही मी प्रथम वापरलेली शब्दरचना आता सर्वजण वापरू लागले आहेत. पहिल्यांदा हत्याकांड हा शब्द मी बिचकत बिचकत लिहिला होता. 'अपराध-पाठलाग मासिकांच्या भडकपणाचा तुझ्यावर प्रभाव आहे' असे त्या वेळी किशोर म्हणाला होता; पण हळूहळू शब्द सर्वत्रच रुजला आहे.

१ जानेवारी ७७

आज 'बालगंधर्व'मध्ये एकही नाटक झालं नाही. सिनेमाचे दोन खेळ ओस पडले होते. एकंदरच सिनेमावाले आणि सर्कसवाले यांचे हाल चालू आहेत.

३० मार्च १९७७

सकाळी अकरा-सव्वा अकरा वाजता लेले म्हणाले, 'अरे, जोशी–अभ्यंकर प्रकरणातले आरोपी मिळाले आहेत अशी गावात अफवा आहे; चौकशी कर.' म्हणून दरेकरांना (सहाय्यक पोलिस आयुक्त) फोन केला. ते म्हणाले 'मला काही माहिती नाही. तो सगळा प्रकार वरिष्ठ लोक हाताळत आहेत. तुम्ही डायरेक्ट कमिशनरसाहेबांना विचारा!' त्यांच्या उत्तरामुळे काही तरी आहे, हे नक्की झालं. म्हणून धावतच कमिशनर–कचेरीत गेलो. सगळे लोक कुठल्या तरी मीटिंगमध्ये होते म्हणून कॉरिडॉरमध्ये येरझाऱ्या घालत थांबलो. इतक्यात कृष्णा कुलकर्णी आणि गुप्ते आले. आम्ही तिघांनीही एकमेकांना 'सहज' आल्याचं सांगितलं, आणि प्रत्येकजण दुसरा कटतो आहे का, हे पाहिलं. सुमारे सव्वा तासानंतर कोणीच कटत नाही असं पाहून तिघंही चौबळांकडे गेलो. त्यांना विचारलं, 'जोशी–अभ्यंकरप्रकरणातले आरोपी मिळाले आहेत, ही बातमी खरी आहे का?'

चौबळ म्हणाले 'या विषयावर असेंब्लीत प्रश्न आहे. त्या प्रश्नाचं उत्तर दिलं जाईपर्यंत मी काहीच सांगू शकत नाही. मी साडेतीन वाजता सर्व वार्ताहरांना बोलावून घेईन. तोपर्यंत असेंब्लीत उत्तर दिलं असेल अशी अपेक्षा आहे.'

साडेतीन वाजता सगळे लोक जमले. 'सकाळ'चे मी, राजू आणि मनीर असे तिथे होतो. इतर वर्तमानपत्रांचेही दोन-दोन, तीन-तीन लोक होते; पण चौबळांनी 'अजून प्रश्नोत्तरं झाली नाहीत. पावणे-पाच वाजता जमू या,' असं सांगितलं. बाहेर पडल्यावर 'केसरी'चे प्रमोद जोग आणि कृष्णा कुलकर्णी आमच्या तिघांवर नजर ठेवून होते. उलट आम्ही त्यांच्यावर. आम्हीच एकमेकांवर कुरघोडी करण्याची शक्यता होती. इतरांची कुणालाच चिंता वाटत नव्हती. त्यामुळे आम्ही पाचजणांनी इन्स्पेक्टर XXX यांना गाठलं. त्यांना म्हणालो, 'पावणेपाच वाजता कमिशनरसाहेब सगळं काही सांगणार आहेत; पण तुम्ही आधी बॅकग्राउंड सांगितली तर बरं पडेल.' कमिशनर माहिती देणार आहेत हे माहिती असल्याने इन्स्पेक्टर XXX यांना त्यात काही वेगळं वाटलं नाही; पण तरीही सावधगिरी म्हणून त्यांनी XX हॉटेलातील फॅमिली रूममध्ये जाण्यास सांगितलं. त्यानुसार आम्ही निघालो. गोपाळराव पटवर्धनांना आमच्या हाल-चालींची शंका आली. त्यामुळं तेही आमच्या पाठोपाठ XX हॉटेलात आले. इन्स्पेक्टर XXX तिथे दुसऱ्या रस्त्याने येऊन थांबले होते.

फॅमिली रूममध्ये त्यांनी माहिती दिली ती धक्कादायक होती. नुसतं जोशी–अभ्यंकर प्रकरण नव्हे, तर बाफना प्रकरण, नदीत प्रेत सापडलेल्या पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्याचा खून अशा एकंदर चार प्रकरणांशी आरोपींचा संबंध होता असं ते म्हणाले. बेपत्ता हेगडे-प्रकरणाशी याचाच संबंध असावा, असंही ते म्हणाले. गोखले खून-प्रकरण आणि बाफनांच्या घरातील धाडसी हल्ला हे प्रकार जोशी–अभ्यंकर प्रकरणाचाच भाग आहे, हे राजूचं मत खरं निघालं.

पावणेपाच वाजता आम्ही चौबळांकडे गेलो. ते म्हणाले, 'अजूनही प्रश्न विचारला गेला नाही. मी काहीही सांगू शकत नाही. आपण उद्या भेटू.' सर्वजण निघाल्यावर मी आणि कृष्णाने त्यांना विचारलं, 'आम्हाला अन्य मार्गांनी काही माहिती मिळाली तर ती छापायला काही हरकत नाही ना?' चौबळ म्हणाले, 'तुमच्या जबाबदारीवर छापा. अन्य मार्ग बंद केलेले आहेत अशी माझी खात्री आहे.'

चौबळांना असं वाटलं असावं की, तीन तासांपूर्वी या बावळट पोरांना अक्षरसुद्धा माहिती नव्हतं. आता काय डोंबल्याची माहिती मिळणार? पण निदान एक मार्ग तरी आम्ही उघडला होता.

'सकाळ' कचेरीत आल्यावर मुनीरने मुख्य बातमी लिहिण्यास सुरुवात केली. राजू पार्श्वभूमी आणि इतर तपशील मिळवत होता. मला काहीच काम नव्हतं म्हणून मी फोटो मिळवण्याच्या मोहिमे-वर निघालो. चार आरोपींपैकी दोन फोटो मिळाले. म्हटलं, 'आपण फोटो वापरू किंवा न वापरू, इतरांचा फोटो मिळविण्याचा मार्ग बंद झाला, हे खूप झालं.' ते फोटो मिळाल्यावर XX वर्तमानपत्रात गेलो. ते लोक म्हणाले, 'फोटो मिळाले पाहिजेत.' 'पण मिळणार कुठून?' असं मी त्यांना विचारलं. अर्थात खिशात फोटो असताना. नंतर वेळ जाईना म्हणून 'कल्पना' हॉटेलात गेलो. तिथे रमेश शेट्टी होता. तो म्हणाला, 'काय रिपोर्टर, इथं कुठे थांबतोस? पेशवे पार्कात काही तरी गडबड आहे. ती पहा आणि येता येता मला सांग.' म्हणून पेशवे बागेत गेलो. तळ्यापाशी गॅसबत्त्या, बरेच पोलिस, एक बुरखे-वाला आणि काही अनोळखी लोक दिसले. एक पोलिस कॉन्स्टेबल भराभरा पुढे आला आणि ओरडायला लागला, 'ए कोण आहे? चल हाकल, चालता हो!' असं म्हणून मला दंडाला धरून खेचू लागला. खेचत खेचत लांब नेलं आणि हळूच 'पिपात हाडांचा सांगाडा मिळाला. विश्व हॉटेलवाल्याच्या मुलाला यांनीच ठार मारलं,' ही माहिती दिली आणि डोळा मारून पुन्हा ओरडू लागला, 'अरे, काय तमाशा आहे का? चला चालू लागा!' माझे काम झाले होते.

'कल्पना'च्या दारात रमेश उभा होता. त्याला विचारलं, 'प्रकाश हेगडेचा फोटो मिळेल का?'

'का, काय झालं?'

'त्याचा शोध लागण्याची शक्यता आहे.'

रमेश घाईघाईने शेजारच्या हॉटेलात गेला. सुंदरराव हेगडेंना माहिती सांगितली. त्यांनी लगेच एका वेटरला घरी पाठवून फोटो मागवला. रमेशने फोटो माझ्याकडे दिल्यावर मी त्याला खरा प्रकार सांगितला. रमेशला सुचेनासंच झालं. मुलाचा तपास लावण्याची आशा दाखवून फोटो मिळवणं ही कुशल बातमीदारी असली तरी अनैतिक होती.

तिथून धावत-पळत ऑफिसात आलो. मुणगेकर म्हणालं, 'दोन फोटो मिळालं ना?' मी आश्चर्यचकित झालो की यांना कळलं कसं? मग समजलं की, मी फोटो आणायला बाहेर पडल्यावर मी कुठे जाणार हे ओळखून मुणगेकरांनी संबंधित माणसाला मी पोचण्या-पूर्वीच फोन केला होता आणि फोटो घेऊन मी निघाल्यावर संबंधिताने मुणगेकरांना उलट फोन करून फोटो दिल्याचं सांगितलं होतं. तिन्ही फोटो ब्लॉकखात्यात पाठवून मी बातमी लिहायला घेतली. सर्वांपेक्षा आमची बातमी उत्तम असणार, अशी माझी मलाच रुखरुख वाटत होती यात शंकाच नाही.

## ३१ मार्च १९७७

काल मला वाटलं तसा एकच अन्य मार्ग उघडा नव्हता. इतर मार्गांनाही पाझर फुटले होते. 'सकाळ' आणि 'केसरी' शिवाय इतरत्रही बातमी होतीच; पण जितकी माहिती मिळाली तितकीच. 'केसरी'पेक्षा आम्ही दोन आरोपी आणि हेगडे यांचे फोटो छापून आघाडी मिळवली. बाकी तपशील जवळजवळ सारखाच होता. ज्या वर्तमानपत्रात तपशील कमी होता त्यांनी कल्पनेच्या बऱ्याच भराऱ्या मारल्या आहेत.

दुपारी इन्स्पेक्टर × × × ऑफिसात आले होते. आम्हाला माहिती कशी मिळाली हे त्यांना काढून घ्यायचं होतं; पण आम्ही तिघांनीही 'मला माहिती नाही' असं सांगितलं. त्यामुळे इन्स्पेक्टर भयंकर संतापले. खरं म्हणजे तपासात त्यांचा मोठा वाटा होता; पण काल इन्स्पेक्टर ××× यानी यांचं नावच सांगितलं नव्हतं आणि नाहीत त्यांची नावं सांगितली. त्याप्रमाणे ती छापूनही आली. यांचा राग स्वाभाविक होता. आम्ही त्यांच्यावर अन्यायच केला.

## १ एप्रिल १९७७

चौबळांनी आज प्रेस कॉन्फरन्स घेतली. चांडक नावाच्या आणखी एकाआरोपीला अटक केल्याचं सांगितलं. आनंद वझे, वसंत फाटक आणि सतीश गोरे यांना अटक केलेली नाही. चौकशी चालू आहे असं सांगितलं. एकाएका वर्तमानपत्राचं नाव घेऊन चुकोचं काय

छापलं आहे ते सांगितलं. आमच्या बातमीत काहीही चूक नव्हती.

या प्रकारांमागे आणखी कोणी आहे का? हेगडे-प्रकरणातील चिठ्ठ्या, आरोपींना एकदा पकडून सोडलं वगैरेबद्दल चौकशी करू म्हणाले. काल आम्ही आणि आज टाइम्सने फोटो छापले असल्याने बराच ओरडा करीत होते; परंतु पोलिस वर्तमानपत्रांना विश्वासात घेत नाहीत. माहिती दडपून ठेवतात. त्यांना हवा त्या मार्गाने वर्तमानपत्रांचा वापर करतात. त्यामुळे नव्या वातावरणात वर्तमानपत्रं त्यांच्याशी अशीच वागणार. आम्ही पोलिसांचे नोकर नव्हे.

आरोपींकडून जप्त केलेले दागिने अभ्यंकरानी ओळखल्याचे समजतं. प्रेस कॉन्फरन्सनंतर समोरच्या खोलीत मांडलेल्या पुराव्याच्या वस्तू पाहिल्या. त्यात दागिने, सोन्याची लगड, अत्तरे, मोजे वगैरे बऱ्याच वस्तू आहेत.

३ एप्रिल १९७७

आज लकडी पुलाच्या खाली बराच शोध झाला. काही मिळालं नाही. अभ्यंकरांच्या खुनाच्या रात्री जक्कल वगैरे गुडलकमध्ये दिसले याबद्दल आरोपींच्या नावाचा किंवा गुडलकचा उल्लेख न करता मोघमात काहीजण एका हॉटेलात चहा पीत बसले होते, असा मजकूर दिला आहे. उद्या निकाल लागल्यावर अनेक जण आपल्याला जक्कल दिसला, असं सांगू लागतील. त्याबाबतीत मी खरंच पाहिले होते हे रेकॉर्ड निर्माण करण्यासाठी मी हा मजकूर देऊन ठेवला आहे. गोपाळराव पटवर्धनांचं हे तंत्र आहे.

५ एप्रिल १९७७

मॅजिस्ट्रेट कोर्टात आरोपींना हजर केलं. सात दिवस पोलीस कस्टडी मिळाली. मॅजिस्ट्रेट साठे आमच्या कॉलेजातच होता. मी त्याला अनेकदा पाहिलं आहे. बहुधा मी पी. डी. ला असताना तो टी. वाय. च्या वर्गात होता. दिसायला सुंदर होता. अजून तसाच दिसतो.

९ एप्रिल १९७७

आज एस. डी. एम. पुढे ओळख-परेड झाली. काय झालं त्याचा तपशील कळला नाही. नंदू घाटेंनी महापालिकेत पोलिसांचा अभिनंदन ठराव मांडला. मागे घेतला असे कळले.

११ एप्रिल १९७७

आरोपींना बुरखा नको, असं ए. रहमाननी सांगितलं. साठेंनी कलुषित माहिती देऊ नये, असा पोलिसांना हुकूम केला आहे.

१५ एप्रिल ७७

आज जक्कलला घरी आणलं होतं. कशाला ते समजलं नाही, भयानक गर्दी झाली होती. लोक पागलपणे गर्दी करतात.

१५ एप्रिल ७७

नव्या पुलाखालून जक्कल-जगतापने सुरा, ग्लास वगैरे वस्तू काढून दिल्या. महापूर पहायला व्हावा तशी गर्दी होती; नदीच्या पात्रात बाहेर गेलेल्या देवळात गेलो होतो. बरीच वर्षं जावं जावं म्हणत होतो. जक्कलमहाराजांच्या निमित्ताने गेलो.

२० एप्रिल ७७

पाच जणांना अफजलपूरकरांच्या कोर्टात आणले होते. सात दिवस पोलिस-कस्टडी. जगताप, शहा यांच्या आईने मुलांना भेटू दिले जात नाही, अशी तक्रार केली आहे. मॅजिस्ट्रेट आणि कलेक्टर दोघेही अफजलपूरकर असल्याने लोकांचा घोटाळा होतो आहे. अनेकजण विचारतात की, कलेक्टर कचेरीत रिमांडसाठी आणतात का?

२५ एप्रिल ७७

सतीश गोरे या सहाव्या आरोपीला अटक केली. पाच-सहा दिवसांपूर्वी बंडगार्डन पोलिसठाण्यात हा काटकुळा मुलगा पाहिला होता; पण नाव माहिती नव्हतं.

२७ मे ७७

गोरेचा कबुलीजबाब सुरू झाला. तपशील गुप्त आहे. चांडकला उद्या आणणार आहेत. तोदेखील कबुलीजबाब देईल, असं पोलिस म्हणतात.

२८ मे ७७

गोरेचा जबाब संपला. चांडकने कबुलीजबाब देण्याची कोर्टापुढे तयारी दाखवली आहे.

८ ऑगस्ट ७७

माफीचा साक्षीदार करावे, असा चांडकतर्फे वाईकरांना अर्ज दिला. सरकारतर्फे शामराव सामंत स्पेशल प्रॉसिक्यूटर आहेत. पूर्वी गोठोस्कर इंजिनियर प्रकरणात ते सरकारी वकील होते. ती केसदेखील फार सुंदर होती.

११ ऑगस्ट ७७

गोरेला आरोपींच्या यादीतून वगळावे,असा अर्ज दिला. गोरेबाबत पोलिसांचं धोरण हेच दिसत होतं. मग अटक, कबुलीजबाबाचं नाटक का केलं कोण जाणे.

१७ ऑगस्ट ७७

गोरे आणि चांडक यांचे अर्ज वाईकरांनी मंजूर केले.

आज कृष्णा कुलकर्णी पुन्हा कॅमेरा घेऊन आला होता. मागे एकदा त्याने जक्कलला 'जरा पोज दे' असे म्हणून फोटो घ्यायचा प्रयत्न केला त्या वेळी जक्कल खवळला होता. 'परमेश्वराच्या कृपेने आणि वकिलाच्या प्रयत्नाने मी सुटणार आहे. बाहेर आल्यावर तुझ्याकडे बघून घेईन!'' अशी धमकी दिली होती. इतके होऊनही कृष्णा पुन्हा आज हजरच. हा फोटोग्राफर बाकी ग्रेट आहे. मोरारजी असोत, पुण्याचा मेयर असो की जक्कल असो याचा फ्लॅश कधीच वेळेवर उडणार नाही आणि वर 'जरा पोज' म्हणून नंतर फोटो काढील. कॉर्पोरेटर मंडळींना दहादहा मिनिटे पोज देऊन उभे करण्याची सवय लागल्याने हे असे होते.

२९ एप्रिल १९७८

आज चौघांवर आरोप ठेवला. आता खरं म्हणजे आरोपी म्हणता

येईल. इतके दिवस संशयित म्हणायला हवे होतं. कोर्टात गर्दी अफाट होती. शिरस्तेदारांनी आरोप वाचून दाखवले. चौघांनीही नाकारले. जगताप तर 'काय मान्य ?', 'आता वाचून दाखवलं ते?', 'नाही', असं करीत होता. साधारणपणे कोर्टात आणताना माणसं खलास होतात. हे चौघे निर्विकार होते. वर्षभराच्या येरवड्याच्या मुक्कामात चौघेही सशक्त झालेले दिसले. इतकी कलमं आहेत की, त्यांचा अर्थ समजावून घेणं म्हणजे ताप झाला.

१५ मे १९७८ : पहिला दिवस

या प्रचंड प्रकरणाला आज सुरुवात झाली. तसा पहिला दिवस भाकडच गेला. प्रमोदला विचारलं, 'किती मजकूर देणार ?' तो म्हणाला, 'जे जे घडेल ते ते. पुढे सबएडिटर्स ओरडू लागतील त्या वेळी आपोआप कमी करू' पण हे बरोबर वाटेना म्हणून मुणगेकरसाहेबांना विचारलं. त्यांचं मत पडलं, साक्षीच्या महत्त्वानुसार ठरवावं.

पोलिसपदक मिळवणारे चितळू यांची पहिली साक्ष झाली. त्यांची उलट तपासणी घेताना कोळसे पाटील नर्व्हस झालेले दिसले. इतकं नर्व्हस होऊन चालणार नाही. दुसरा पंच म्हणजे पोलिशी विनोदच दिसतो. पेशवेबागेत कँटीन चालवणारा माणूस आरोपी बघायला बंडगार्डनपाशी गेला आणि तिथे नेमकं त्यालाच बोलावून पेशवेबागेत पंचनाम्याला नेलं हे पोलिसांचं म्हणणं असंभाव्य वाटतं.

जक्कल–सुतार यांनी आज कोर्टाला अर्ज देऊन फोटो छापण्यास मनाई करण्याची मागणी केली आहे. फोटो छापून काय होणार आहे!

आज गर्दी मात्र अफाट होती. आत शिरणं म्हणजे मुश्कील. त्यातून दिवसभर बसायचं म्हणजे कठीणच. कधी सवयच नाही. कॉलेजात असताना एकाआड एका तासाला बसायचो. एका जागी बसायला नको म्हणून तर कुठे कारकुनी करण्याऐवजी बातमीदारीत शिरलो. आता दोन-तीन महिने हाल होणार. पुन्हा दिवसभर नोटस घ्यायच्या आणि संध्याकाळी घाईघाईत मजकूर द्यायचा.

आज असंख्य पोलिसअधिकारी कोर्टात बसले होते. त्याबद्दल कोळसे पाटलांनी तक्रार केल्यावर कोर्टाने संबंधितांनी बसू नये, असा निर्णय दिला. नंतर काही जण उठले; परंतु चौबळ उठले नाहीत. वस्तुतः ते तपासाशी संबंधित होते. आर्य. जी. पी. हुद्द्याच्या माणसाने कोर्टाचा हुकूम मोडायला नको होता.

१६ मे ७८ : दुसरा दिवस

दिवसभर एकच पंच झाला. अतिशय चेंगटपणे काम चालू होते. या वेगाने दोनशेसहासष्ट साक्षीदार संपायला किती वेळ लागेल कोण जाणे. आजही अफाट गर्दी होती.

आरोपीचे वकील भेटले होते. ते म्हणाले आमच्या × × आरोपीविरुद्ध तसा फारसा पुरावा नाही. आहे तो उडवून देता येईल अशी आशा वाटते. एका मुद्द्यावर बोलताना त्यांना विचारले, 'तो तिथे नव्हताच असे तुम्हाला वाटते का ? त्यावर ते म्हणाले, 'तो तिथे नव्हता असे आम्ही फक्त म्हणणार आहोत' म्हणजे वकिलांनासुद्धा आपल्या अशिलाबद्दल 'खात्री' वाटते आहे.

१७ मे ७८ : तिसरा दिवस

कालच्या पंचाची साक्ष आज संपली. नागूअण्णांच्या प्रश्न विचारण्याच्या पद्धतीमुळे शामराव सामंत म्हणाले, 'या पद्धतीमुळे खटला संपायला चार वर्षे लागतील !' सरकारी वकिलांना रोजंदारी पद्धतीने पैसे मिळत असल्याने नागूअण्णांनी 'त्यात तुमचा काय तोटा आहे', म्हणून फटकारलं.

प्रकाश हेगडेच्या धाकट्या भावाची साक्ष झाली. तसाच दिसतो. चांगली साक्ष झाली. आज कामाचा एकंदर वेग बरा होता.

१८ मे ७८ : चौथा दिवस

विश्व हॉटेलच्या मालकाची आज साक्ष झाली. मुलगा गेल्यामुळे हताश झाल्यासारखा वाटला. त्यांनी बऱ्याच शांतपणे साक्ष दिली; पण मध्येच अस्वस्थ होऊन म्हणाले, 'मुलगा गेल्यापासून माझ्या डोक्यावर परिणाम झाला आहे. तोंडाला येईल ते मी बोलतो. मी मॅड झालो आहे, मॅड.' सगळं दाबून ठेवलेलं दुःख असं बाहेर पडलं.

१९ मे ७८ : पाचवा दिवस

आज डेंगळ्यांची साक्ष झाली. मोहिते आणि नागूअण्णा यांनी घेतलेल्या उलटतपासणीत त्यांनी 'माहीत नाही, आठवत नाही' अशी उत्तरं दिली. दोन वर्षांपूर्वी आंतर महाविद्यालयीन स्पर्धात बक्षिसं मिळवणारा, उत्तम यश, शिष्यवृत्त्या मिळवणारा विद्यार्थी मला माहिती नाही असं सांगणं पटलं नाही. माहितो नसेल तर त्या जागेवरील व्यक्तीला अशा गोष्टी माहिती हव्या. आमच्या प्राचार्यांना कॉलेजातील प्रत्येक ठळक मुलाची पूर्ण माहिती असे.

आज सर्वांत विशेष म्हणजे प्रकाशच्या आईची साक्ष. बाई दिसण्यात रुबाबदार आहे. मनोनिग्रहाने पिंजऱ्यात उभी होती. तिच्या मनात काय खदखदत असेल हे दाताखाली ओठ चिरडण्याच्या पद्धतीमुळे समजत होतं. तिचं मराठी कानडी वळणाचं होतं. 'देवदास आमचं थोरलं मुलगं असतं,' 'त्याला भांडणगिडण करायचं कारण नव्हतं,' 'तुमच्यासारखं मराठी आम्हाला येत नसतं,' अशा प्रकारे बोलत होती. मला वाटलं, ही बाई हमसाहमशी रडणार; पण तसे काही झालं नाही. 'होम दे ब्रॉट हर वॉरियर डेड' कवितेतील बाई समोर उभी राहिल्यासारखं वाटत होतं.

२० मे ७८ : सहावा दिवस

अजून खटल्याच्या कामाला रंगच चढत नाही. आज चांडकची साक्ष सुरू झाली. आज काही तरी नाटक घडावं, चांडक उलटेल, निदान उलटावा, येनकेन प्रकारेण रंगतदार बातमी मिळावी असं वाटत होतं. याच कोर्टहॉलमध्ये कॅपिटॉल बाँब केसमध्ये माफीचे साक्षीदार हरिभाऊ लिमये उलटले होते. मात्र तसं नाटक झालं नाही. भलताच प्रकार झाला.

चांडकचे वकील ब. ना. भिडे यांनी कोर्टाला अर्ज दिला. एका कैद्याने चांडकला छोटे पाकीट दिले. आरोपींनी किंवा इतरांनी हे पाकीट पाठवले असावे. साक्षीदाराला संरक्षण मिळावे' अशी अर्जात मागणी होती. 'चांडक ह्यास वकिलाचे म्हणणे आहे, तू पूर्ण फिरलास तर आम्ही सुटू नाही तर सुप्रीम न्यायालयापर्यंत नं. १ व

२ ला फाशी कायम आहे. साक्ष खोटी आहे हे सांगण्यासाठी वकिलाने कायद्यातील I. P. C. १२९ प्रमाणे तुला धोका नाही, असा निर्णय दिला. तुला १० हजार रु. देऊ. साह्य हवे. तुला पुराव्याअभावी शिक्षा होत नाही. वकील तुझी जबाबदारी घेतील. त्यात सर्वांचा फायदा आहे. तुझाही. परमेश्वर इच्छा.' असा चिठ्ठीचा मजकूर आहे. सर्व मजकूर वेगवेगळ्या पॉईंटचे जाड टाईप वापरून जुळवलेला, प्रूफ काढलेला दिसतो.

आरोपी आणि आरोपीच्या वकिलांनी अशी चिठ्ठी पाठविल्याचं नाकारलं आहे; परंतु त्यातून मनात आलेल्या शंका अशा: (१) चिठ्ठी मिळाल्यानंतर आत्तापर्यंत चांडक गप्प का राहिला? (२) अशी चिठ्ठी तुरुंगात तयार झाली याचा अर्थ तेथील कारभार काय असेल? (३) चांडकच्या कपड्यांची झडती झाली. कपडे बदलले तेव्हा चिठ्ठी बाहेर आलीच कशी? (४) चिठ्ठी प्रकरण पोलिसांनी शिजवलं असेल का? समजा चिठ्ठीप्रकरण खरं असेल तर तुरुंग खात्याची ढिलाई स्पष्ट होते. तुरुंगात महात्मा गांधींनी लावलेल्या आंब्याच्या झाडाचे फोटो घेऊ देण्यास किंवा बारीकसारीक माहिती देण्यास वर्तमानपत्रांना नकार देणाऱ्या इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्सचा कारभार असा आहे तर!

चांडकमहाराजांनी साक्ष देताना बऱ्याच मोठमोठ्या दुरुस्त्या केल्या आहेत. त्याचा कबुलीजबाब मी शब्दश: वाचला आहे. त्यातील बराचसा भाग जसाच्या तसा रिपोर्ट केला आहे. त्यामुळे त्याच्या दुरुस्त्या मला लगेच लक्षात आल्या. माझ्यासारख्या माणसाला हे फरक समजले याचा अर्थ चांडक आता तरी खोटे बोलतो आहे किंवा पूर्वी तरी खोटेपणा केला असणार! संबंधित व्यक्ती बारीकसारीक चुका करील? इतक्या मोठ्या चुका कशा होतील? उद्या उलटतपासणीत त्याची हजामत होईल.

## २३ मे ७८ : सातवा दिवस

दिवसभर चांडकची उलटतपासणी चालू होती. शामराव आणि जाधवराव सारखं मधे तोंड घालीत होते आणि त्याला सावध करीत होते. कुस्तीत डाव अंगाशी आल्यावर चावणाऱ्या पैलवानासारखा त्यांचा रडीचा डाव चालू आहे. 'हो किंवा नाही' या उत्तरावरील 'तुम्ही बायकोला जोड्याने मारणे थांबवलं का?' हा विनोद शामरावांनी तिसऱ्यांदा केला. त्यांचा विनोदाचा स्टॉक बराच कमी असला पाहिजे.

## २४ मे ७८ : आठवा दिवस

आज कोळसे पाटलांनी चांडकची उलटतपासणी संपविली.

आजचे काम संपल्यावर कोळसे वकिलांना फोन केला. ते म्हणाले; 'जरा येता का? महत्त्वाचे बोलायचे आहे' म्हणून त्यांच्या घरी गेलो. ते बरेच नर्व्हस झालेले दिसले. ते म्हणाले, "अहो, हा खटला म्हणजे जिवाशी खेळ झाला आहे. वकीलपत्र दाखल केल्यापासून रोज धमक्या देणारे फोन आणि पत्रे यांचा मारा चालला आहे. दारावरून जाताना लोक पाटी वाचीत जातात. कुठे हॉटेलात गेलो; समारंभात गेलो तर लोक 'जक्कलचे वकील' म्हणून बोटे दाखवितात. फौजदारी कामे करायची म्हणजे हे होणारच म्हणून मी काळजी करीत नव्हतो.

गेले तीन-चार दिवस वकीलपत्र सोडा नाही तर तुमचा जोशी-अभ्यंकर करू असे फोन येत आहेत. त्यालाही घाबरलो नव्हतो; पण काल रात्री इथे चोरी झाली. खोली बंद करून झोपलो होतो, पहाटे उठून पहातो तर चादरी, टेबलावर ठेवलेले पैसे वगैरे गायब, उन्हाळा असल्याने बाल्कनीचे दार उघडे ठेवले होते. जो चोर बाल्कनीतून येऊ शकतो तो आमचा जोशी-अभ्यंकरही करू शकतो.'

मला काही यात गंभीर वाटले नाही. कारण उन्हाळ्यात अशा भुरट्या चोऱ्या होतातच; पण ज्या चोराने चोरी केली असेल तो आज मित्रांना अभिमानाने सांगत असेल 'बघ बेट्या, कोळसे-पाटलांच्या घरी चोरी केली!'

## २५ मे ७८ : नववा दिवस

नागू अण्णांनी चांडकला उलटतपासणीत साफ उलटासुलटा करून लोळवला. सत्यवचनी असल्यासारखा त्याचा प्रारंभी आव होता; पण नागूअण्णांनी साफ केल्यावर अस्वस्थ झाला.

मधल्या सुट्टीत इन्स्पेक्टर कदम यांना भेटून तो म्हणाला, 'त्यांना काही तरी सांगा, नाही तर माझे डोकं फार गरम आहे.' वकिलांची प्रश्न विचारण्याची पद्धत अत्यंत अपमानकारक असते, चीड येते हे खरं असले तरी गुन्ह्यात भाग घेऊन माफीच्या अटीवर खरे बोलणाऱ्या माणसाशी आरोपीचे वकील तरी काय चांगले वागणार?

## २७ मे ७८ : दहावा दिवस

अजून हेगडे-प्रकरणच चालू आहे. पिपाचं काम करणारा वेल्डर आणि पोलिस वगैरे साक्षी झाल्या. एकूण दिवस भाकडच.

## ३० मे ७८ : अकरावा दिवस

शरीरशास्त्राचे प्राध्यापक डॉ. मुकुंद टंकसाळे यांची साक्ष झाली. साक्षीनंतर म्हणाले 'टकसाळे लिहा, टाकसाळे नको. नाही, तर मुकुंद टाकसाळे नावाचा दुसराच माणूस लेखक आहे. तो आणि मी वेगळे आहोत.'

मुकुंद टाकसाळेचा या डॉक्टरना बराच उपद्रव झालेला दिसतोय. कारण त्यांचं लिखाण कुठं तरी चालू असतं आणि वाचक या डॉक्टरांना म्हणत असतील 'वा, वा! डॉक्टर तुमचा लेख छान झालाय बरं का!'

अर्थात या डॉक्टरचा आम्हालाही ताप झालाच. सर्व साक्ष इंग्रजीत. त्यातले त्यांचे शब्द स्पेलिंग सांगितले तरी बोंबलायला अर्थ कुठे माहिती होते! डॉक्टरांपाठोपाठ केमिकल ॲनलायझरची साक्ष झाली. ही साक्षही आंग्ल भाषेत. 'सुपर इपोजिंग' करून कवटी हेगडेचीच आहे असं त्यांनी मत दिलं. सगळ्या साक्षी मराठीत देण्याची सक्ती केली पाहिजे. या लोकांचं इंग्रजी कळत नाही असं नाही; पण तांत्रिक शब्द समजावून घ्यायचे आणि वाचकाला समजावून द्यायचे, हा फारच ताप आहे.

## १ जून ७८ : बारावा दिवस

जोशी-प्रकरण बरंच संपलं आहे-आज कोल्हापूर-प्रकरण सुरू

झालं. बऱ्याच साक्षी झाल्या. कामही वेगाने झालं; पण एकूण घटनेत तसा रस वाटण्यासारखं काही नसल्याने कंटाळा मात्र आला.

गेले अनेक दिवस पहातो आहे की गर्दी भयंकर होते. त्यात बायकांचा भरणा खूप. त्यातही सुशिक्षित, सधन आणि तरुण मुली मोठ्या प्रमाणात येतात. या पंधरा ते वीस वर्षांच्या मुली काम काजाकडे लक्ष देत नाहीतच. त्यांचं सर्व लक्ष आरोपींकडे असतं. आरोपींकडे म्हणण्यापेक्षा जवकलकडे! अक्षरशः भान हरपून अर्धा अर्धा तास त्याच्याकडे पहात असतात. आरोपींकडे पहाण्याच्या नादात पदर पडला तरीही या बायकांचं लक्ष नसतं. अर्थात तरुण मंडळीचं लक्ष नेमकं तिथेच असतं. कुतूहल समजू शकतं; पण हा प्रकार विकृत मनोवृत्तीचा वाटतो. कामकाज चालू असताना साक्षीदाराची फजिती झाली की या मुली आणि एकूणच प्रेक्षक मनापासून खळखळून हसतात. सरकारी वकिलानं चांगला विनोद केला तर [illegible] मात्र असतात. आरोपीच्या वकिलाचा विनोद झाला की हशा पिकतो.

आरोपी म्हणजे कोणी तरी महात्मे आहेत, वीर पुरुष आहेत असं कोर्टातील वातावरण पाहिल्यावर वाटेल. सिनेमात किंवा बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथेत पोलिस बावळट बुद्दू असतात आणि गुन्हे करणारा हीरो अत्यंत चतुर असतो, ही गोष्ट प्रेक्षक-वाचक गृहीत धरतात. अशाच लोकांची कोर्टात दिवसेंदिवस गर्दी वाढते आहे.

अर्थात एक गोष्ट खरी की, हे आरोपी ज्या प्रकारे निर्भयपणे वागतात, रुबाबदार दिसतात, ते पाहता आकर्षण वाटणं स्वाभाविक आहे. हे चौघेजण भगतसिंग-राजगुरु किंवा नक्षलवादी क्रांतिकारक असते तर लोकांनी कोर्टातच त्यांचा जयजयकार केला असता. □

---

# समर्थ नेतृत्व

पृष्ठ ६ वरून

निवडणे हे प्राथमिक कार्यही होऊ शकले नाही. अस्थायी समित्याच सध्या पक्षाचे काम पहात आहेत. खालपासून वरपर्यंत रीतसर पक्षसमित्याच जेथे अस्तित्वात नाहीत तेथे पक्षांतर्गत लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जाणार कसे? हीच स्थिती वर्षअखेरपर्यंत चालू राहणार असे दिसते.

ही परिस्थिती निर्माण झाली याचे एक कारण पाच पक्ष एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन झाला खरा; पण त्यातून एकसंध पक्ष निर्माण झालेला नाही. लोकशाहीच्या रक्षणासाठी विभिन्न धोरणाचे हे पक्ष एकत्र आले खरे; पण सत्ता हाती येताच सत्ताधारी पक्षात येणारे सारे दोष जनता पक्षातही दिसू लागले. पक्ष आपल्या प्रभावाखाली आणण्यासाठी घटक-पक्षात स्पर्धा सुरू झाली. पक्षसंघटनेपेक्षा आपला गट बळकट करण्यावरच त्यांनी लक्ष केंद्रित केले. जनसंघ आणि भारतीय लोकदल यांनी हातमिळवणी करून उत्तरेकडच्या राज्यातील सत्ता आपसात वाटून गेली. जनसंघ व भालोद यांचा एक गट व पूर्वीच्या काँग्रेसवाल्यांचा एक गट असे दोन तट जनता पक्षात पडल्याचे दिसून आले. संसदीय जनता पक्षात मात्र जनसंघ व भालोद यांची एकजूट टिकू शकली नाही. राजनारायण यांनी पंतप्रधान मोरारजीभाई आणि पक्षाध्यक्ष चंद्रशेखर यांच्याविरुद्ध सुरू केलेली मोहीम जनसंघाला मान्य नव्हती. मोरारजी – चरणसिंग संघर्षात त्यांनी मोरारजीभाईंना पाठिंबा दिला. वाजपेयींनी नंतर मध्यस्थाची भूमिका घेतली; पण मध्यस्थांचे प्रयत्न अयशस्वी झाले. त्यांनी सुचविलेला तोडगा फेटाळला गेला. अशा स्थितीतही पक्षात फूट न पडता सर्वांना एकत्र ठेवले आहे ते सत्तेने.

समर्थ नेतृत्वाचा अभाव एकट्या जनता पक्षातच नव्हे तर सर्वच पक्षांमध्ये जाणवत आहे. इंदिरा गांधींमध्ये नेतृत्वगुण आहेत; पण त्यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीचा एकदा अनुभव आलेला आहे आणि त्यांच्या वृत्तीत कोणताही बदल झालेला नाही; पण समर्थ नेतृत्व नाही, म्हणून हताश न होता कार्यकर्त्यांनी कार्य चालू ठेवायला हवे. पाच पक्ष एकत्र येतील असे तरी कोठे वाटले होते? परिस्थितीनेच त्यांना एकत्र आणले. तसे परिस्थितीतूनच समर्थ नेतृत्व उदयास येईल अशी आशा करणे, एवढेच सध्या आपण करू शकतो. दरम्यानच्या काळात निष्ठावंत कार्यकर्त्यांनीच सामुदायिक नेतृत्व उभे केले पाहिजे आणि ज्येष्ठ नेत्यांकडून चुका होत असतील तर त्यांना योग्य मार्गावर आणले पाहिजे.

□


अलीकडे आलेल्या भीषण महापुरामुळे

लक्षावधि देशबांधव निराधार झाले आहेत.

त्यांना आपल्या मदतीची गरज आहे.

सढळ हातांनी मदत करा!

खालील पत्त्यावर देणग्या पाठवा–

**पंतप्रधान राष्ट्रीय साह्य निधी**

साउथ ब्लॉक, नवी दिल्ली ( 110 011 )

# अवती-भवती : पृष्ठ ५ वरून

विखुरलेले / विभागलेले आहेत. अशा स्थितीत, जिला आपण मुसलमानांची समस्या म्हणून संबोधतो, ती प्रत्यक्षात संपूर्ण भारताची आणि भारतीयांचीच समस्या नव्हे काय? अर्थात ही समस्याही संपूर्ण भारतभर एकच, एकजिनसी आहे, असंही नाही. उदाहरणार्थ, शिक्षण, रोजगार, व्यक्तिगत कायदा आणि समाजसुधारणा, उर्दूचं संरक्षण–संवर्धन (एकूण भारतीय मुस्लिमांपैकी ४५% मुस्लिमांची मातृभाषा उर्दू आहे ), जीव–वित्त सुरक्षितता, मालमत्ता, सांस्कृतिक वैशिष्टयांचं जतन, लोकशाही–राजकारण–देशाची उभारणी यातला प्रभावी सहभाग अशा अनेक बाजू या प्रश्नाला आहेत आणि त्या वेगवेगळ्या ठिकाणी कमी–अधिक प्रमाणात प्रभावी आहेत. एकच उदाहरण देतो काश्मीरमध्ये मुस्लिम हाच बहुसंख्य समाजगट आहे; परंतु हा समाजगट बहुश: अशिक्षित, निर्धन आणि शोषित अवस्थेत आहे. आपल्या संख्येच्या प्रमाणात आपली ताकद–राजकीय, सामाजिकदृष्टया– प्रस्थापित करणं त्याला शक्य झालेलं नाही ! इतरत्रही हा समाजगट अतिशय विस्कळित स्वरूपात आहे. भारतातल्या एकूण मुस्लिम लोकसंख्येपैकी ७३% लोक हे ग्रामीण भागात राहतात, हे येथे लक्षात ठेवले पाहिजे. या समाजगटाला एकत्र ठेवणारा दुवा म्हणून इस्लाम धर्माचा विचार करावा तर धार्मिक भावना ही सामाजिक व्यवहारात नेहमीच प्रबळ असते असं नाही. इस्लामचा दुवा हा त्याला आव्हान दिलं जाण्याचा धोका निर्माण होतो तेव्हाच फक्त सामर्थ्यवान असतो. हे भारतीय उपखंडाच्या बाबतीत तरी निश्चित सत्य आहे. अर्थात इस्लामसारख्या कडव्या मानल्या जाणाऱ्या जागतिक धर्माची परिस्थिती सर्वत्र अशीच आहे, हेही खरंच. एरवी (पूर्वीच्या) पूर्व पाकिस्तानातल्या बंगाली मुस्लिमांनी पश्चिम पाकिस्तानातल्या पंजाबी/उर्दूभाषी मुस्लिमांच्या वर्चस्वाविरुद्ध बंड का केलं ?

अर्थात इस्लाम जागतिक असला, तरी भारतीय मुस्लिम हे अनेकार्थानं भारतीय आहेत. एक तर भारतीय उपखंडाच्या गेल्या सातशे वर्षांच्या इतिहासाच्या सर्वांगीण जडण-घडणीशी त्यांचा निकटचा संबंध राहिलेला आहे. अनेक शतकं मुस्लिमांच्या कोणत्या ना कोणत्या पंथाच्या हातात या उपखंडाची राजसत्ता एकवटलेली होती आणि म्हणून इथली संमिश्र व गुंतागुंतीची सस्कृती, समृद्ध कला–शिल्प–साहित्य–चित्र आणि अन्य विद्याशाखांच्या विकासातही मुस्लिमांची कामगिरी मोठी आहे. हा ऐतिहासिक वारसा ध्यानात घेतला की, भारतात मुस्लिम उपरे, परके आहेत असा दृष्टिकोन बदलल्याशिवाय राहणारच नाही. भारतातल्या मुस्लिमांची केवळ संख्याबळाच्या हिशेबाने 'अल्पसंख्यांक' म्हणून बोळवण करण्याऐवजी त्यांचा समाजी-सांस्कृतिक वारसा आणि त्यांचं वादातीत राजकीय स्थान लक्षात घेऊन त्यांना 'भारतीय जनतेतला दुसऱ्या क्रमांकाचा प्रभावी समाजगट' म्हणून मानलं–ओळखलं–वागवलं जावं, असा मुद्दा श्री. रशिदुद्दिन खान यांना आग्रहानं मांडायचाय्. भारतीय मुस्लिम हे भारतीय आहेत, असं याआधी म्हटलं आहे, त्याला आणखीही एक लहानसा आधार आहे. भारतीय समाज हा प्रथमपासून श्रेणीबद्ध ( hierarchical ) आहे आणि सामाजिक विषमतेला इथं परंपरेनंच पाठबळ दिलंय्. अशा स्थितीत कुराणामध्ये जातिभेद अथवा अन्य प्रकारच्या विषमतेला यत्किंचित थारा नसतानाही भारतातल्या मुस्लिमात जात, बिरादरी, जन्मानुसारी श्रेष्ठ-कनिष्ठता हे सगळे हिंदू रिवाज सुप्रतिष्ठित आहेत, या गोष्टीच्या कारणाकडे मात्र डोळेझाक करण्यात येऊ नये. भारतीय मुस्लिमांपैकी फार मोठी संख्या ही आक्रमकांनी तलवारीच्या बळावर धर्मांतर करून 'बनविलेल्या' मुस्लिमांची आहे. अशा स्थितीत मूळच्या हिंदू संस्कृतीचा पगडा – मग तो चांगला असो वा वाईट – व्यवहारात कायम राहणे साहजिकच होते. तरवारीने सुंता होऊ शकली, समानता येऊ शकली नाही. तरवारीऐवजी अन्न / धन वापरून बाप्तिस्मा देणाऱ्यांच्या 'मिशन'चा अनुभवही हाच आहे. रशिदुद्दिन खान यांनी हे ऐतिहासिक सत्य मांडायला हरकत नव्हती.

मुस्लिमांबद्दल विचार करताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. एक तर मुस्लिमांची संख्या ही आजवर बहुसंख्यांकांना सतत धमकीवजा वाटत आली आहे – जसं हरिजनांची संख्या ही अनेक ठिकाणी सवर्ण हिंदूंना धमकावणारी वाटते; पण शीख / पारशी / जैन यांची संख्या तशी कुणालाच वाटत नाही. तेव्हा मुस्लिमांच्या संख्येकडे 'धोकादायक' याच पूर्वग्रहातून पाहिलं जातं. दुसरं, काही उद्योगधंदे, प्रशासनातील काही विभाग आणि राजकारण या क्षेत्रात मुस्लिमांच्या एकवट संख्येकडे भीतिग्रस्त मत्सरानं आणि संघर्षाच्या आशंकेनंच पाहिलं जातं. साहजिकच याची प्रतिक्रिया मुस्लिम समाजगटातही उमटतेच. तसंच अशा 'धोकादायक' समाजगटाला दडपून टाकण्याचा घाईघाईचा प्रयत्नही समर्थ बहुसंख्यांकांकडून शक्य त्या क्षेत्रात कळत–नकळत सुरू होतो. आज भारतात सामाजिक–आर्थिक दर्जाचे सर्व निकष – दरडोई उत्पन्न, साक्षरता, अन्न-धान्याचा दरडोई पुरवठा, नोकरी-धंद्यातील संधी, वैद्यकीय सुखसोयी, नागरी हक्कांची अंमलबजावणी – हे लावून पाहिल्यास, बहुसंख्य मुसलमान हे प्रगतीच्या खालच्या दोन / तीन पायऱ्यावर उभे असलेले दिसतील. फार काय, मुस्लिमांमधील उच्च आणि मध्यम वर्गालाही त्यांच्या पात्रतेपेक्षा, आवश्यकतेपेक्षा व प्रमाणशीरतेपेक्षा कमीच वाटा विकासप्रकल्पांमध्ये, शिक्षण – उद्योगधंद्यामध्ये मिळतो. उदाहरण पहा – १९७४ मध्ये केंद्रीय सचिवालयात सहा मुस्लिम सचिव होते, १९७८ मध्ये ही संख्या घसरून एकावर आली आहे. आय्. ए. एस्. व आय्. पी. एस्. दर्जाच्या एकंदर अधिकाऱ्यांत मुस्लिमांचे प्रमाण फक्त ३·०९% आणि ३·१९% ( अनुक्रमे ) आहे. यामध्येच ख्रिश्चन अधिकाऱ्यांचे प्रमाण (अनुक्रमे) २·४४% आणि २·०४% इतकं आहे, हे इथं लक्षात घेतलंच पाहिजे. १९६५ पेक्षा मुस्लिमांचं हे प्रमाण खूपच खाली घसरलं आहे. केंद्रीय लेखनिकवर्गात तर मुसलमानांचं प्रमाण फक्त ०·२% आहे, असं समजतं. शिक्षणक्षेत्रातली स्थितीही काहीशी अशीच. देशातल्या ३६०४ महाविद्यालयांपैकी फक्त ५४ महाविद्यालयांचे व्यवस्थापन मुसलमान समाजाकडे आहे, तर देशातल्या सर्व तांत्रिक शिक्षण संस्थांमधील एकूण जागांपैकी फक्त ३·५% जागा मुसलमान विद्यार्थ्यांना मिळालेल्या आहेत. ज्या उत्तर प्रदेशात भारतातले एकचतुर्थांश मुस्लिम राहतात आणि जिथे मुस्लिमांची संख्या एकंदर लोकसंख्येच्या साडेपंधरा टक्के आहे, तिथे दरवर्षी फक्त १२,००० म्स्लिम मुलं-मुली शालांत परीक्षेला बसतात. त्यातलीही निम्मीच पास होतात. तुलनात्मक आकडेवारी सांगायची तर उत्तर प्रदेशातील मुस्लिमेतर लोकसंख्येपेक्षा मुस्लिम मुलं, शैक्षणिकदृष्टया पाच पटीनं, तर मुली अकरा पटीनं मागं आहेत ! ज्याचा गाजावाजा प्रचंड प्रमाणावर केला जातो, त्या अलिगड मुस्लिम विद्यापीठात प्रत्यक्षात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची एकंदर संख्या केवळ ५,००० आहे.

अलिगड हे मुस्लिमनिरक्षरतेच्या घनघोर वाळवंटातलं लहानसं ओअॅसिस आहे, एवढंच फार तर म्हणता येईल !

अधिक परिणामकारक उदाहरण घ्यायचं तर जरा हैद्राबादकडे वळू या. भारतातल्या पाचव्या क्रमांकाच्या मोठ्या अशा या शहरात सुमारे पाचएक लाख मुस्लिम एकत्र राहताहेत आणि त्यांची ही संख्या हैद्राबाद विभागाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४५% आहे. या शहरात घेण्यात आलेल्या तीन सामाजिक– आर्थिक पाहण्यांवरून असं दिसतं की, शहरातल्या दहांपैकी नऊ रिक्षावाले मुसलमान आहेत. ५ ते ६ माणसांचं कुटुंब आणि जास्तीत जास्त १५० रु. मासिक उत्पन्न ही आहे त्यांची परिस्थिती. शहरातले एकूण ८% लोक झोपडपट्ट्यात राहतात आणि या झोपडीवासियांपैकी ५३% दलित हिंदू व २१% मुस्लिम आहेत. या २१% मुस्लिम प्रजेपैकी सुमारे निम्म्यांचं उत्पन्न शून्य ते पन्नास रु. महिना या श्रेणीत बसतं ! शहरातल्या एकूण भिकाऱ्यांत दलित हिंदू व मुस्लिम यांची साधारण सारखी म्हणजे ४०% च्या आसपास आहे. हैद्राबादमधले तीन-चतुर्थांश मुस्लिम ज्या दक्षिण हैद्राबादेत (बाल दा शरीफ) एकवटलेले आहेत, तो भाग साक्षरता, रोजगार, उद्योग, व्यापार या चारही निकषांवर पाहता निकृष्टतम अवस्थेत आहे, असा अहवाल 'हैद्राबाद मेट्रोपॉलिटन प्रॉजेक्ट'नं दिलेला आहे !

'मुसलमानांची' म्हणून जी समस्या गणली जाते, तिच्यात उर्दू-भाषिक मुस्लिमांचा आणि त्या भाषेचा प्रश्न, सामाजिक व भावनिकदृष्ट्या खूपच मोठा व महत्त्वाचा आहे. आपल्या भाषेकडे आणि पर्यायानं आपल्याकडे दुर्लक्ष होतंय, साहजिकच देशातल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रवाहांपासुन आपण वेगळे पडतोय् अशी भयग्रस्त भावना या समाजगटात निर्माण झाली आहे, होत आहे, असं दिसतं. उर्दू भाषा हा देशाच्या फाळणीचा सर्वांत मोठा आणि सर्वाधिक दुर्दैवी सांस्कृतिक बळी म्हणावा लागेल. भारताच्या संमिश्र संस्कृतीची वाहक, तत्त्वज्ञानाचं माध्यम, उत्कृष्ट काव्याचं माहेरघर आणि धार्मिक व राजकीय वाङ्मयाचा मूलस्रोत म्हणून उर्दूचं वैभव ज्या पिढीनं स्वातंत्र्यपूर्व काळात पाहिलंय, सर्व क्षेत्रातलं उच्च शिक्षण, कायदा आणि प्रशासन यांची भाषा म्हणून उर्दूची उपयुक्तता ज्यांनी अजमावलीय्, त्यांना स्वातंत्र्योत्तर काळात 'फक्त काही मुसलमानांची भाषा' असा शिक्का मारून उर्दूला ज्या तऱ्हेनं कचऱ्यात लोटून देण्यात आलं, ते पाहून निश्चितच खेद झाला असता. उर्दू ही अराष्ट्रीय भाषा नाही. ती केवळ मुसलमानांची भाषा नाही, कधीच नव्हती. ती एक भारतीय भाषा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात हैद्राबाद संस्थानची राजभाषा तीच होती आणि पंजाब, बिहार, उत्तर प्रदेशातल्या अनेक शहरांची व्यवहाराची भाषाही उर्दूच होती. उर्दू भाषेनं आणि अनेक उर्दू–भाषिकांनी स्वातंत्र्यलढ्यात सतत सक्रिय भाग घेतलेला आहे. आज अवस्था अशी आहे की उर्दू, घटनेनं मान्य केलेल्या पंधरा राष्ट्रीय भाषांपैकी एक असली तरी पंधरांपैकी ती एकच अशी भाषा आहे की, जिच्या भाषिकांची संख्या प्रचंड असूनही आणि भाषावार प्रांतरचना झालेली असूनही जिला वेगळे राज्य मिळालेले नाही. एवढंच नव्हे तर ज्या राज्यात उर्दू-भाषिकांची संख्या बरीच मोठी आहे तेथेही तिला 'दुसरी राजभाषा' म्हणून स्थान दिलं जात नाही. याबाबत अन्यायकारक नियम पुढे केले जातात. उर्दूच्या नैसर्गिक वाढीला घातली जाणारी ही खीळ म्हणजे अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक खच्चीकरणाची सुरुवात असावी असा संशय उर्दू–भाषिकांच्या मनात यावा अशी परिस्थिती आहे. एक तर उर्दूतून शिक्षण मिळण्याच्या सुविधा अत्यंत अपुऱ्या आणि त्यातही उर्दूतून शिकलेल्यांना नोकरी-धंदा मिळण्याची संधी त्याहून अधिक दुर्मिळ, अशा अवस्थेत उर्दू-भाषिकांना नाइलाजानं, सक्तीनं भाकरीच्या मोबदल्यात हळू हळू भाषा सोडून द्यावी लागली तर त्यात नवल नाही !

तेव्हा भारतीय मुस्लिमांची आणि उर्दूची समस्या ही अशी आहे. ती अल्पसंख्यांकांची समस्या नसून भारतीयांची समस्या असल्याचं आपण किती लवकर मान्य करतो आणि त्यानुसार कृती करतो, यावर बरंच काही अवलंबून आहे. 'अल्पसंख्यांक आयोग' ही झाली वरवरची मलमपट्टी आणि तीही मूळ प्रश्नावरून सर्वांचंच लक्ष दुसरीकडे वेधणारी. नोकरशाहीच्या खेकटयात गुदमरलेल्या या आयोगाचे धिंडवडेही सर्वांना ठाऊक आहेतच. रशिदुद्दिनखान यांच्या या विषयीच्या विचारांचा मागोवा घेण्याचा हा प्रयत्न आहे, त्यांचे विचार सर्वांनाच पटतील असं नाही; पण विचार प्रक्षोभक मात्र निश्चित वाटतील.

अर्थात ही समस्या आजवर न सुटण्याचं कारण काय? सरकार हे एकमेव कारण यामागे आहे काय? 'रविवार'चे मुनीर नियाजी यांनी परखड शब्दात मुस्लिम नेत्यांवरच या समस्येची मोठी जबाबदारी टाकली आहे. मुस्लिम नेत्यांनी भारतीय मुसलमानांचा आपल्या स्वार्थाच्या खेळातली प्यादी म्हणून वापर फक्त केला आहे, असं स्पष्ट मत देऊन ते म्हणतात की, जातीय दंगली, उर्दू भाषा, मुस्लिम पर्सनल लॉ आणि अलिगड मुस्लिम विश्वविद्यालय या चारच महत्त्वाच्या समस्या आपल्यासमोर आहेत, असाच भ्रम या नेत्यांनी सर्वसामान्य भारतीय मुसलमानांमध्ये पसरवून दिला आणि कायम ठेवला. याखेरीज ज्या सार्वत्रिक समस्या– बेकारी, महागाई, दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ– संपूर्ण देशासमोर सतत उभ्या होत्या, त्यांच्या सोडवणुकीच्या बाबतीत आपलं काही कर्तव्य आहे, याची जाणीव या नेत्यांनी सामान्य मुस्लिम जनतेला कधीच करून दिली नाही. कारण मुस्लिम जनता या मार्गानं देशाच्या मोठ्या प्रवाहात मिसळली तर, तिच्या नेतृत्वाचे लगाम आपल्या हातून निसटतील, हा स्वार्थ त्यात दडला होता. मुसलमानांच्या वेगळ्या समस्या पेटत ठेवण्यातच त्यांचं कोटकल्याण होतं आणि म्हणून आपल्या समाजगटाच्या अडचणी या मूलभूत मानवी समस्यांच्या रूपात उभ्या करून त्यांना संपूर्ण भारतीय समाजाचा पाठिंबा मिळविण्याचे प्रयत्न त्यांनी केलेच नाहीत. उलट, आपल्या समाजगटाच्या आर्थिक, सामाजिक अशा समस्यांनाही धार्मिक स्वरूप देऊन 'इस्लाम खतरे में' असल्याचा आरडाओरडा करणेच त्यांना सोयीचे होते. उदाहरणार्थ, जातीय दंगे हा काय फक्त मुसलमानांचाच प्रश्न आहे? अमेरिकेतल्या काळ्या–गोऱ्यांच्या वांशिक दंगलीप्रमाणे हा मबंध माणुसकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. त्याला धार्मिक, संकुचित स्वरूप दिल्याने प्रश्न सुटण्याऐवजी चिघळलाच नाही काय? उर्दूच्या विकासाचा प्रश्न हाही सांस्कृतिक आणि भाषिक पातळीवर सोडविण्याऐवजी धार्मिक पातळीवर नेण्यानं नुकसानच झालं नाही का? 'उर्दू ही मुसलमानांची / अल्पसंख्याकांची भाषा आहे आणि म्हणून तिला संरक्षण मिळालं पाहिजे' अशी मागणी ज्यांनी केली, त्यांनी मुस्लिम समाजगटाला तात्पुरतं भारावून टाकण्यात यश मिळविलं खरं; पण त्याचबरोबर बहुसंख्यांकांपैकी एका कडव्या गटाचा विरोध ओढवून घेण्याचा धोकाही पत्करला.

राष्ट्रीय नेतृत्वाचा हा प्रश्न मुस्लिम समाजगट कसा सोडविणार आहे, यावरच त्यांची 'राष्ट्रीय समस्या' सुटणं अवलंबून आहे, असं वाटतं. □

विदेशी चित्रपट । अशोक प्रभाकर डांगे

# गाणाऱ्या गावाची गोष्ट

आम्ही साऱ्या बरोबरच कपडे बडवतो. आम्ही ते बरोबरच ते निळीत टाकतो. लाकडी टबात शिजवूनही काढतो आणि एकमेकी बरोबरच ते वाळत घालतो, आम्ही त्यांना इस्त्री करतो आणि घरोघर ज्याचे त्याला नेऊन पोहोचवतो. आमचं आयुष्यच असं आहे. घासण्या-पुसण्यातच आमचा जन्म गेला. आम्ही सैनिकांची अंतर्वस्त्रं धुतो. आम्ही धर्मगुरूंचे झगे शुभ्र करतो. आम्ही पोलिसांचे सॉक्स स्वच्छ करतो आणि आचाऱ्यांचे एप्रनही धुतो. आम्ही खाटकांचे अंगरखे साफ करतो आणि सुंदर स्त्रियांचे फ्रॉकही धुतो. धुता-धुताच आमचं आयुष्य सरलं. सुख हे साबणाच्या फेसासारखं असतं. वेळप्रसंगी आम्ही आकाश पण चक्क लख्ख धुऊन काढू. आम्ही भुईलाही उजळून टाकू. आम्ही सूर्याला देखील उकळून काढू, जगातलं अमंगळ सारं धुऊन टाकू; पण मनातलं पाप धुणं ?

ते मात्र अशक्य आहे !

हे एक सुंदर गाणं आहे. एका गात्या गावातलं गाणं आहे. एका उंच मनोऱ्याखालच्या उघडया बखळीत, सामुदायिक धुणं धुणाऱ्या धोबिणींचं हे गाणं आहे. त्यांच्याकडे स्टुलं आहेत. त्या स्टुलांवर गोलाकार लाकडी भांडी. ती कपडे धुवायला, फेसात, निळीत टाकायला. मध्यभागी कपडे शिजविणारी एक कॉमन भट्टी आणि बाजूला वाळत घालायच्या दोऱ्या. एका सुरात गात गात त्या कपडे धुतायत आणि एका सुंदर तालावर नाचत नाचत वाळतही घालतायत.

हे गावच गाणारं आहे. त्यातल्या प्रत्येकालाच ताल आहे. सूर आहे. म्हणून तर ही धोबिणींची कैफियत पण तालावर चाललीय. सुरातून सजलीय. इथली पोरंबाळं, म्हातारे-कोतारे, पोलीस-खाटीक, सैनिक-शिंपी, सारेच सुरात गाणारे आणि तालात वावरणारे.

पावले हा ह्याच गावचा रहिवासी. तो व्यवसायानं गाडीवान आहे. एका म्हाताऱ्या घोडीला जोडून तो आपली लांबलचक लाकडी गाडी ओढतो. आहे गरीब, पण गोबऱ्या गालांचा, दाढी वाढलेला आणि डोक्यावर गोल टोपी घालून फिरणारा. पावले दोन पोरींचा बाप पण आहे. ह्या देखण्या पोरी मारो आणि टिम्पा आठ-दहाच वर्षाच्या आहेत. पावले विधुर आहे; पण पोरींचं आपल्या त्या दिवंगत आईवर एवढं प्रेम की, त्या तिचाच फोटो समोर ठेवून त्या फोटोलाच आपलं नाच-गाणं दाखवतात. आपल्या गरीब बापावरही त्यांची अपार माया आहे आणि वार्दो आण्टीवर देखील.

वार्दो आण्टी गाणाऱ्या गावातलीच एक. धोबीकाम करणारी. तरुण, देखणी आणि अविवाहित. नाजूक, सरळ नाक. चौकोनीसा चेहरा. आकर्षक आविर्भाव. खूप हसरी, खूप खेळकर वार्दो आण्टी कुणालाही आवडेल अशीच आहे. म्हणूनच गावच्या प्रमुखाला देखील तो निष्पाप, निरागस, प्रामाणिक तरुणी आवडते. नव्हे त्या गाणाऱ्या गावातल्या प्रत्येकाची तिच्याबद्दल हीच भावना असते. पावले पण गरीब आहे. शिवाय त्याचं पोट त्याच्या हातावर आहे. बऱ्याचदा त्याचा धंदा होतो, बऱ्याचदा होतही नाही आणि गाडी चालली नाही की उपास, त्याला आणि त्याच्या निरागस पोरींनाही; पण पावलेचा दोष एकच. तो पक्का प्रामाणिक आहे. दुसऱ्याच्या सुखानं आनंदित होणारा नि दुसऱ्यांच्या दुःखानं व्यथित होणारा आहे. म्हणून तर सारेच पावलेवर प्रेम करतात. बारमध्ये आला तर त्याच्याबरोबर नाचतात, गातातही आणि त्याला मद्यही पाजतात. गावात एक इटालियन नृत्यशिक्षक आलेयत. त्यांनी नृत्याचा वर्ग काढलाय. पावलेच्या पोरींना नाचाची आवड आहे. आता त्यांच्या मनात आलंय की, आपणही त्या वर्गात नाव घालावं. त्यांना असंही वाटतंय की, त्यांच्या मृत आईला त्यांनी नृत्य असं शिकणं आवडणारय. त्या दोघी आपला बेत वार्दो आण्टीला सांगतात आणि आण्टी वार्दो कुठं तरी ( चोरूनच ) क्लासच्या प्रवेशपरीक्षेला घालायला म्हणून पोषाख पैदा करते. मग त्या दोघी त्यांचा पालक असलेल्या पावलेला इटालियन शिक्षकाकडे परीक्षेला बळानंच घेऊन जातात. मास्तर परीक्षा घेतात. तर त्या पोरी झकासच नाचतात. नृत्यातली त्यांची गती पाहून तोही त्यांच्यावर खूष होतो. म्हणतो, तुम्ही झारच्या पोरींनाही नृत्यात मागं टाकाल; पण पन्नास रूबल फी ऐकल्यावर पावले हादरतो. 'हे प्रकार आपल्यासारख्यांसाठी नाहीत,' असं सांगून पोरींना परत आणतो. त्या चिमुरड्या पोरीही समजायचं ते समजतात. मनातनं नाराज होऊन जातात.

ह्या प्रकारानं पावले अस्वस्थ होतो. पोरींवर त्याचं अपार प्रेम. आता त्याची गरिबीच पोरींच्या भवितव्यात आडवी येत असते. एक मध्यरात्र. भयाण अंधार. रिकामे रस्ते. उरात सलणारं दुःख. दारिद्र्य व हतबल झालेला पावले आपली गाडी हाकत एकटाच परत येत असतो आणि पिळवटणाऱ्या सुरांत गात असतो.

मी सुख मिळवू पाहातो,
तर दुःखच माझ्या हाती येतं.
ह्या जगात दुःखच इतकं वाढलंय,
की एके दिवशी त्या दुःखानं,
सारं आकाशदेखील काळवंडून जाईल.
परमेश्वरा,
आता तूच माझ्यावर दया दाखव.
जर तू माझ्याच डोळ्यांत डोकावून पहाशील
तर, तिथल्या दुःखानं
तुझी दृष्टीदेखील करपून जाईल.
स्वप्नं पहाणं बरं नव्हे
कारण स्वप्नांची सत्य होत नसतात !

पावले अस्वस्थ असतो. त्या दिवशी दर्दभऱ्या आवाजात आपली व्यथा गात असतो. वार्दो आण्टीही अस्वस्थच असते. कारण

वार्दोचं पावलेवर खरंखुरं प्रेम असतं. त्याच्या पोरक्या पोरींवर तिचा जीव असतो. त्या जणू तिच्या काळजाचाच एक तुकडा असतो. म्हणून इकडे वार्दो आण्टीही परमेश्वराला बजावत असते.

परमेश्वरा;
एक सत्कृत्य करण्यासाठी
मला पाप करावं लागणार असेल,
तर मी पाप करणारच आहे !
दुसऱ्यांच्या भल्यासाठी
मी जरूर जरूर पाप करेन !

आणि आण्टी वार्दो ते पाप करतेही. आणि एक नव्हे तर, तीन पापं पार पाडते. बाहेर सर्वत्र थंडीचं साम्राज्य. घरं दारं गोठलेली. शुभ्र बर्फाखाली जणू सारं गावच झाकलं गेलेलं. पावलेच्या पोरी कुडकुडत झोपलेल्या, पाय पोटाशी घेऊन. पावले कुठे तरी बरळत पडलेला. वार्दो पावलेची गाडी बाहेर काढते, गावातल्या एका श्रीमंत जमीनदाराच्या घरापुढे रचलेली लाकडं पळवते. गाडीत भरून घेऊन येते. शेगडी पेटवते. कुडकुडणारं घर उबेनं भरून जातं. थंडीत काकडणाऱ्या पोरी सकाळी जाग्या होतात. डॅडीनी लाकडं आणल्यानं खूष असतात. पावले हा प्रकार पाहून गोंधळतो; पण गप्प बसतो आणि मुकाट गात गात त्याच्या बरोबर करवतीनं ती मोठी मोठी लाकडं कापू लागतो.

आण्टी वार्दो आणखी एक पाप करते. खाटकाच्या दुकानापुढे हुकाला टांगलेलं पण सोललेलं वासरू पळवतं आणि गावातल्या चोरीचा माल घेणाऱ्याला देऊ करते. तो दोन रुबल देऊ करतो, तर ती पाचाखाली द्यायला तयार नसते. मग सौदा सुटतो. 'काणाला सांगशील तर बघ !' असा वर दमही दिला जातो आणि जाता जाता त्यातलंच थोडं मांस गरिबांना वाटायला म्हणून वार्दो निमूट काढून घेते आणि ते पावलेच्याच घरात आणून शिजत टाकते आणि निघून जाते. अन्नाच्या नुसत्या वासानंच उपाशीपोटी झोपलेल्या पावलेच्या पोरी जाग्या होतात. खुशीनं नाचू–गाऊ लागतात. 'डॅडींनी आणलंय' म्हणतात. पावले भोळासांब त्याला कसलाच पत्ता नसतो. तो ह्याही प्रकारानं चक्रावून जातो. पोरी मिरी-मसाला टाकतात आणि त्या दिवशी मग पावलेचं कुटुंब एखाद्या श्रीमंतासारखं जेवण घेतं. निदान पावलेच्या पोरींना तरी तसं वाटतं.

आता वार्दोचं तिसरं पाप. वासरू विकत घेताना चोरीच्या मालाचा व्यापारी तिला म्हणालेला असतो, 'ह्या भयंकर थंडीत जर मला कोणी चांगला कोट आणून देईल तर मी त्याला पन्नास रुबलदेखील देईन !' वार्दो हे शब्द मनात पक्के पुन्हा पक्के करून घेते आणि गावातल्या त्या श्रीमंताचा गरम कोट पळवते. तो त्या व्यापाऱ्याला विकते आणि पन्नास रुबल वाजवून घेते. मग त्या इटालियन नृत्यशिक्षकाचं दार ठोठावते. त्याला सांगते, 'कोचमन पावलेच्या पोरी तुमच्याकडे आल्या होत्या. त्यांच्या नाचाची ही फी. आता तरी त्यांना शिकवा; पण फी कोणी दिली ते मात्र पावलेला सांगू नका !'

वार्दोचा वाद पुरा होतो. पावलेसाठी, त्याच्या पोरींसाठी काही केल्याचा आनंद तिला मिळतो. तेवढ्यात गावात एकच बोंबाबोंब ! एकाच वेळी चोरीच्या तीन तक्रारी गावप्रमुख, 'चीफ'कडे येतात. एका श्रीमंत जमीनदाराची दारातली लाकडं आणि उंची कोट पळविल्याची तक्रार आणि एका खाटकाची घरापुढंच सोडलेलं वासरू पळवल्याची तक्रार. गावातली वृत्तपत्रं अनेक खऱ्या-खोट्या बातम्या पिकवितात. एकच गदारोळ माजतो. मग सारे वार्दो आण्टीचाच संशय घेतात. चीफ चोरी झालेली घरं तपासतो. कुत्र्यांकडून हुंगवतो; पण काहीच होत नाही. चीफ वार्दोवरचा आरोप फेटाळतो. 'एका सज्जन आणि निष्पाप पोरीला' ह्यात गुंतवायचं नाकारतो. आधी तक्रार करणाऱ्या खाटकालाच तुरुंगात डांबतो आणि तीन रुबल लाच घेऊन मग त्याला लगेचच सोडून देतो. वर चीफ स्वतःशीच म्हणतो, आपण त्याला सोडला हेच बरं. उगाच कुणा निष्पाप माणसावर अन्याय नको. आपण तशी थोडी–फार लाच घेतो; पण कुणावर अन्याय मात्र होऊ देत नाही. मग चीफ त्याच्याकडे तक्रार करायला आलेल्या इटालियन नृत्यशिक्षकाला आणि त्याच्या बायकोला तुरुंगात घालतो. वर त्यांना सांगतो, तुम्ही इथे येऊन आमच्याच लोकांकडून पैसे उकळता. हे मुळी अन्यायकारक आहे !

तेवढ्यात चीफकडे एक गरीब म्हातारा येतो. पावलेला नुकताच घरापुढे लाकडं चिरताना त्यानं पाहिलेलं असतं आणि त्याच्या घरातून येणारा मटणाचा खमंग वास घेऊन पावलेला विचारलेलं असतं.

'काय शिजवताय ?'

'घोडी ! ती नुकतीच स्वर्गातून खाली आली आणि आता माझ्या घरच्या भांड्यात उतरली. केव्हा, कशी कळलंच नाही. मी आपली शिजत ठेवली !'

येवढं उत्तर देऊन मग पावलेनं त्या गरीब म्हाताऱ्याला धक्के मारून तिथनं बाहेर काढलेलं असतं !

आता हाच म्हातारा संधी साधतो. चीफला सांगतो. चोर मला माहीत आहे. 'कोचमन पावलेचं घर तपासा!' चीफ धावत पळत बाहेर पडतो. पावलेच्या घरावर धाड घालतो. बरोबर पोलिसांचा ताफा. ते गोळ्या झाडीत येतात. त्याचं चंद्रमौळी घर तपासतात आणि पोरीच्या विरोधाला न जुमानता पावलेला पकडून नेतात. त्याच वेळी पन्नास रुबल फी मिळालेले इटालियन नृत्यशिक्षक पावलेकडे आलेले. त्याच्या पोरींना शिकायला या, म्हणून सांगायला तर पोलीस त्यांनाही पकडून नेतात.

पावलेच्या पोरी ह्या प्रकारानं घाबरतात. वार्दो आण्टी धोबीघाटावर धूत बसलेली. ह्या तिच्याकडेच धाव घेतात. वार्दो सरळ चीफपुढे जाऊन उभी रहाते. ती त्याला सांगते, 'ते तिघेही निष्पाप आहेत. मीच त्या तीन चोऱ्या केल्या आहेत.' चीफ चाट पडतो. आणि जरा खिन्नपणेच म्हणतो,

'तसं असेल तर मग तुलाच पकडावं लागेल.' वार्दो म्हणते 'मला पकडा; पण ह्यांना सोडून द्या !' मग पोलीस वार्दोला पकडतात. पावलेला आणि त्या इटालियन दाम्पत्याला सोडून देतात. तुरुंगात जाताना वार्दो म्हणते,

'परमेश्वरा,
त्या पोरींसाठी मी चोरी केली.
कारण, माझं त्यांच्यावर प्रेम होतं.
मग मला पाप लागलं तरी हरकत नाही.'

पावले हे ऐकतो तेव्हा त्या भोळ्याला साक्षात्कार होतो वार्दोच्या त्याच्यावरील प्रेमाचा. पोलीस त्याला म्हणतात, 'किती शहाणी बाई ! तुझ्यावर पुरता जीव टाकते; पण तुला काय म्हणा ! निव्वळ गाढव आहेस झालं !'

आता वार्दोला तुरुंगात टाकल्यानं गावातल्या सगळ्या धाविणी खवळतात. त्या म्हणतात,

ती एवढी सालस मुलगी
आणि चांगल्या मनाची.
तिनं आयुष्यात कधी कसलं पाप केलं
नाही. त्या मुलींना मदत करायला गेली
तर त्यांनी तिलाच तुरुंगात टाकली.
परमेश्वरा, तूच बघ आता !
ह्या जगात प्रामाणिकपणाला मुळी
किमतच राहिली नाही.
म्हणून तर वार्दोवर असा अन्याय होतोय.

मग त्या आपली लाकडी भांडी फोडतात, कपडे भिरकावतात, धगधगत्या भट्ट्या

लाथाडतात, धुण्याची कामं बंद करतात.

वार्दोसाठी गावातल्या धोबिणी संप पुकारतात. त्यामुळे मग गावात एकच धमाल. खाटीक आपले अंगरखे स्वतःच स्वच्छ करू लागतात. आचारी लोक आपले एप्रन धुताना दिसतात. पोलिस मुक्तीमध्ये फिरू लागतात, सुंदर स्त्रिया फ्रॉक धुता धुता दमून जातात, तर चीफ कपडे नसल्यानं उघड्यानंच ऑफिसात बसायला लागतात.

एकंदर धोबिणींचा संप गावाला चांगलाच महागात पडतो. सगळ्यांच्याच तोंडाला फेस येतो. सगळ्यांचे कपडे घाण, दुर्गंधलेले. मग सारे लोक चीफकडे धाव घेतात.

चीफला म्हणतात,

'उद्या नाताळ, सगळ्यांच्या घरी सण; पण सगळीकडे दुर्गंधी भरलीय. लोक नाताळ कसा साजरा करणार? तुम्ही ह्या सणाच्या निमित्तानं सदिच्छा म्हणून वार्दोला सोडा!'

पण चीफ ऐकत नाही, असं पाहताच मग ते पुढचं शस्त्र बाहेर काढतात,

'वार्दोला सोडा!

नाही तर सगळ्या धोबिणी संपावर गेल्यायत. उद्या त्या एकत्र येतील, मोर्चे आणतील.

निदर्शनं करतील.

रस्त्यारस्त्यांवर अडथळे उभारतील.

मग बंड पुकारतील.

जर्मनी, पोलंड, हंगेरीकडे मदत मागतील. वॉर्सा, बर्लिन, प्रागचे शत्रू त्यांच्या मदतीच्या निमित्तानं देशावर चालून येतील. म्हणजे उटावच की!'

इतका वेळ गप्प बसलेला चीफ 'बंड' म्हटल्याबरोबर खडबडून जागा होतो, घाबरतो. बेल दाबून पोलिस बोलावतो आणि हुकूम सोडतो,

'वार्दोला सोडा!'

पण नुसतं वार्दोला सोडून भागणार नसतं. पावलेच्या पोरींना नृत्य शिकायला मिळालं नाही तर पोरी नाराज. पोरी नाराज म्हणून मग वार्दो नाराज राहणार. चीफच्या दृष्टीनं तर वार्दो सालस, समंजस बाई. एवढ्या चांगल्या बाईला का म्हणून नाराज करायचं? चीफ आणखी एक फतवा काढतो, त्या इटालीय नृत्य-शिक्षकाला दम भरतो,

'त्यानं त्या दोन पोरींना मोफत शिकवावं. न शिकवल्यास त्याची गावातून हकालपट्टी केली जाईल!'

मग तो इटालियन नृत्यशिक्षक पुन्हा एकदा पावलेचं घर गाठतो. पावलेला म्हणतो,

'तुमच्या मुलींना माझ्या क्लासला पाठवा!'

पावले विचारतो,

'पण रुबलचं काय?'

'त्याची फिकीर करू नका! तुमच्या पोरींना शिकवल्यानं साऱ्या गावालाच आनंद होईल!'

पावलेचा ख्रिसमस आनंदानं साजरा होतो. तो नवं काळं जाकीट घालतो आणि पोरी वार्दोनं शिवलेले चिध्यांचेच पण सुरेख झगे घालतात. वार्दोही त्या आनंदात सामील झालेली. मग ते सारेच नाताळचं गाणं गातात.

'आजच्या दिवशीच ख्रिस्ताचा जन्म झाला.'

वार्दो आणि पावलेच्या मीलनातच ह्या साऱ्याची समाप्ती होते.

हे एक विलक्षण सुंदर रशियन उपहास-चित्र आहे. ह्यातला साराच गाव गातो, नाचतो; पण ह्या चित्रपटकथेचा आशय त्याहून पलीकडचा आहे. झारशाहीला बोचकारे काढणारा. ह्या गावात पावले-वार्दोसारखे असंख्य गरीब अर्धपोटी जिणं जगत असताना इतर थोडे आलीशान जिणं जगण्यात मशगूल झालेले असतात. गावाची सुव्यवस्था पहाणाऱ्या झारच्या पोलिसांची तर इथे विलक्षण टिंगलटवाळी केलीय. आपल्या हाताखालच्यांच्या टकलांवर अंडी फोडून खाणारा हा चीफ बंड, क्रांती असले शब्द नुसते ऐकताच भेदरून जातो. त्याच्या लाचखोरीचा आणि त्याला तत्त्वनिष्ठेचं आवरण देण्याच्या प्रवृत्तीचा उत्कृष्ट उपहास केलेला आढळतो. कधी कधी स्वप्नंदेखील खरी होतात हे पावलेच्या निरागस व्यक्तित्वातून जाणवून देणारा हा सुंदर काव्यमय चित्रपट म्हणूनच आपलं लक्ष पड्यावर खिळवून ठेवतो. □

**चित्रपट : मेलडीज ऑफ टिब्लीसी सबर्बज**
**देश : रशिया.**

---

## पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्ताने : मुखपृष्ठावरून

आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करून पुन्हा नव्याने सांगत आहेत.

परिस्थितीचे पुनःपुन्हा विश्लेषण करून, नवीन संदर्भात कुठलेही तत्त्वज्ञान असे मांडले गेले नाही तर ते जीर्ण होते, नष्टही होते. आपल्याकडे विश्लेषणाचे, कालानुरूप तत्त्वज्ञानाची नव्याने मांडणी करण्याचे प्रयत्न अव्याहत होत राहिलेले आहेत. विवेकानंद ज्या काळात वावरले तेव्हा मिल्ल-स्पेन्सर यांच्या विचारांचा भारतावर पगडा होता, ख्रिश्चन धर्म-प्रचार जोरात सुरू होता. हे वैचारिक व आध्यात्मिक आक्रमण परतवून लावता येईल अशीच आपल्या विचारांची, तत्त्वज्ञानाची मांडणी विवेकानंदांनी केलेली आपल्याला दिसेल. त्यांनी मिल्ल-स्पेन्सरवाद्यांचे तार्किक हल्ले आध्यात्मिक प्रभावाने निष्प्रभ केले व ख्रिस्ताचे सेवातत्त्व हिंदुधर्मात अंतर्भूत करून घेतले. दीनदयाळांचा कालखंड हा भांडवलशाही—समाजवाद या विचारांचा कालखंड. त्यामुळे या विचारांच्या संदर्भात त्यांनी एकात्म हिंदू परंपरेचे विश्लेषण व नवे संस्करण करायला प्रवृत्त होणे साहजिकच होते. त्यांच्या एकात्म मानववादाची उभारणी या दोन विचारसरणींनी उभी केलेली आव्हाने डोळ्यांसमोर ठेवून झालेली आपल्याला दिसेल. भांडवलशाही व समाजवाद या दोन्ही विचारसरणीत एक समान दोष त्यांना आढळला. या विचारसरणीत माणसाच्या फक्त एकाच अंगावर फाजील भर दिला गेलेला आहे. भांडवलशाहीत माणूस फक्त आर्थिक प्राणी मानला गेला तर समाजवादात त्याला राजकीय प्राणी ठरविण्यात आले. तसाच दुसराही एक अतिरेक या दोन्ही विचारणीत आहे. भांडवलशाहीत व्यक्ती या घटकाला अवास्तव महत्त्व देण्यात आलेले आहे तर समाजवादात व्यक्ति-जीवन सामाजिकतेत-राजकारणात पूर्णपणे विलीन होण्याचा धोका दडलेला आहे. आर्थिक-राजकीय अंगांना अवास्तव महत्त्व व व्यक्ती किंवा समाज यापैकी एका घटकाचे प्रभुत्व ही मनुष्याच्या विकासाला मारक ठरणारी दोन टोके आहेत. दीनदयाळांच्या

एकात्म मानववादात या दोन टोकांचे भान विशेष बाळगले गेलेले आहे. मनुष्यपणाची अशी तोडमोड, ओढाताण, फाळणी न व्हावी यासाठी त्यांनी हिंदुधर्मातील चतुर्विध पुरुषार्थांची कल्पना पुन्हा उचलून धरली, नव्या संदर्भात तिची वेगळी मांडणी केली. माणूस म्हणजे केवळ आर्थिक–राजकीय प्राणी नाही, तो समाजाचा गुलाम नाही, तसेच समाजाला आपल्या स्वार्थासाठी केव्हाही, कसाही वेठीस धरणारा शोषक नाही. व्यक्तिविकास आणि समाजस्वास्थ्य यांचा एक विशिष्ट मेळ घालणे हे नियोजनाचे, समाजरचनेचे मुख्य उद्दिष्ट असायला हवे, असे एकात्म मानववादाचे मुख्य प्रतिपादन आहे व भांडवलशाहीचा अस्त व समाजवादाविषयीचा सार्वत्रिक भ्रमनिरास या सद्यःस्थितीच्या संदर्भात हे प्रतिपादन विचारात घेण्याची फार गरजही आहे.

¤

भांडवलशाही-समाजवाद या पश्चिमेकडून आलेल्या विचारसरणीतली आणखीही एक उणीव दीनदयाळांनी दाखवून दिलेली आहे. भाकरीचा प्रश्न, राजकीय जीवनप्रधान मानता मानता या विचारसरणीअखेर माणसाचे उच्च असे आध्यात्मिक जीवनच नाकारतात, ते संपुष्टातही आणतात. भाकरीइतकीच माणसाला आध्यात्मिक सुखाचीही गोडी आहे हे सत्य, ही तत्त्वज्ञाने, या विचारसरणी ध्यानातच घेत नाहीत. धर्म किंवा अध्यात्म म्हणजे पिळवणूक करणाऱ्या वर्गाने आपले वर्चस्व टिकवून धरण्यासाठी उभी केलेली थोतांडे आहेत असा दृष्टिकोन बाळगल्यानंतर माणसाच्या उच्च आध्यात्मिक सुखाची अशी वाताहत उडण्यावाचून दुसरे काही घडूच शकत नाही. दीनदयाळ ज्या हिंदुपरंपरेत वाढले त्या परंपरेला मनुष्यजीवनाची अशी वाताहत मंजूर नाही. भाकरी आणि अध्यात्म या परंपरेने अभिन्न मानले व ऐहिक आणि पारलौकिकाचा मेळ साधणारी व्यक्तिजीवनाची व समाजव्यवस्थेची मांडणी आदर्श ठरवली. माणसाच्या सर्व गरजा, वासना, प्रेरणा, नैसर्गिक प्रवृत्ती विचारात घ्यायच्या, त्यांचा परस्परांशी मेळ घालत घालत शेवटी मोक्षमुक्तीच्या आद्य जीवनप्रेरणेशी त्या जोडून द्यायच्या, त्यांचे हळूहळू उदात्तीकरण साधणारी जीवनाची क्रमबद्ध मांडणी करायची हे हिंदुजीवनपद्धतीचे वैशिष्ट्य आहे व एकात्म मानववाद म्हणजे वेगळे काही विचारधन नसून या प्राचीन पद्धतीचे व परंपरेचे युगानुकूल असे नवे संस्करण मात्र आहे. श्री. गोळवलकरगुरुजी यांनी वेगळ्या शब्दात हे वैशिष्ट्य असे सांगितलेले आहे. गुरुजी म्हणतात—

'आमची प्रकृती कोणती? भौतिकतेचा परमोच्च विचार ठेवूनही त्याहून भिन्न असे जे आहे त्याचा साक्षात्कार आम्हाला झालेला आहे. आम्ही समाजालाही त्याच दृष्टीतून पाहिले आहे. त्यातूनच सुखलाभ होणार आहे. विकासासाठी प्रत्येक व्यक्तीतील गुणावगुण पाहून त्याच्यासाठी स्वतंत्र मार्गाची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

'प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या पावलाने जाता येईल अशी पात्रता उत्पन्न करणे आणि त्या मार्गाने चालताना ती स्वास्थ्यलाभ घेऊ शकेल, हा विचार करून आमच्या समाजाची रचना झाली आहे. त्याला स्थायी स्वरूप प्राप्त व्हावे, याचसाठी शासनसत्तेची निर्मिती केली गेली ...'

¤

यात माणूस व समाज आपल्याला हवे तसे आपले जीवन घडवू शकतो, आपला विकासक्रम ठरवू शकतो, समाज विकासप्रक्रियेची दिशा, गती यावर योग्य ते नियंत्रण ठेवू शकतो असे एक अध्याहृत गृहीतकृत्य आहे. उलट मार्क्सवाद किंवा एकूण भांडवलशाही–समाजवादी तत्त्वज्ञाने ऐतिहासिक अपरिहार्यता अटळ मानतात. समाजव्यवस्था बदलण्याची, नवी घडवण्याची विशिष्ट वाटच माणसाला उपलब्ध आहे, ती वाट निवडण्याचे, वेगळ्या वाटा चोखाळण्याचे स्वातंत्र्य माणसाला नाही असे मानतात व एकात्म मानववादासारखे विचार आदर्शवादी–स्वप्नाळू म्हणून निकाली काढतात. म्हणजे हा प्रश्न पुन्हा नियतीविरुद्ध माणूस या सनातन प्रश्नाशी भिडतो. माणूस नियती बदलू शकतो, तो स्वतंत्र आहे, आपले जीवनाकार घडवण्याचे विशिष्ट मर्यादेत त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे, नव्हे तसे त्याने ते सतत घडवत राहिले पाहिजेत, जुने टाकून देत, नवे आकृतिबंध रचत अखेर पूर्ण स्वातंत्र्याचा, मुक्तीचा अनुभव घेणे हेच मानवी जीवनाचे साफल्य आहे, अशी एकात्म मानववादाची धारणा आहे. ही धारणा खरी, की ऐतिहासिक अपरिहार्यता खरी याचा निकाल अर्थातच केवळ पुस्तकात लागणार नाही. आपण रशिया–चीनपेक्षा येथील मानवी विकासाचा काही वेगळा घाट निर्माण करू शकलो तर एकात्म मानववाद हे केवळ स्वप्नरंजन नसून एक जितेजागते तत्त्वज्ञान आहे हे आपोआपच सिद्ध होणार आहे. टिळक म्हणत असत त्याप्रमाणे, कुठल्याही तत्त्वज्ञानाचा कस शेवटी कुरुक्षेत्रावर लागत असतो, भोजनाच्या ताटावर नाही. कुरुक्षेत्र लांब नाही. एकात्म मानववादी तत्त्वज्ञानाचे उपासक या कुरुक्षेत्रावर केव्हा दाखल होतात, कशी व्यूहरचना करतात यावर शेवटी या तत्त्वज्ञानाचे यशापयश अवलंबून राहणार हे उघड आहे.

—श्री. ग. माजगावकर

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# मैं तुलसी तेरे आँगन की

## काकोडकरांची कालेलकरी कथा

एक कोठी. तिच्यावर फक्त नाचणारी एक वेश्या. एकदा एक रईस तिच्यासाठी कोठीवर येतो. मग बलात्काराचा फारसा प्रयत्न न होता (अर्थातच त्याचे वर्णनही नाही) ती वेश्या त्याच्या तावडीतून सुटते आणि एका ठाकुराच्या हातात आणि प्रेमात पडते. मग दोघांच्या प्रणयाचे फारसे वर्णन न करताही दोघांना एक मुलगा होतो. दरम्यान त्या ठाकुराचे लग्नही होते. या विवाहित दंपतीलाही वरीलप्रमाणेच एक मुलगा होतो आणि ठाकूर मरतो ती दोन पोरेही फारसे शृंगारिक चाळे करीत नाहीत. त्यातील खल-मुलगा फक्त एकदा कोठीवर जाऊन गाणे ऐकतो आणि नाच पाहतो.

—तर अशी आणि याच तऱ्हेने पुढे जाणारी एखादी शुद्ध शाकाहारी कथा ऐकली, तर ती कोणाची म्हणून झटकन नाव येईल? माझ्यापुढे तरी मधुसूदन कालेलकर वा बाळ कोल्हाटकर हे नाव यईल. 'मी तुळस तुझ्या अंगणी' अशी मराठी नऊ अक्षरे पाहिल्यावर तर मी कोल्हाटकरांचे नाव पक्केच केले. (संदर्भ–वाहतो ही दूर्वांची जुडी, दिवा जळू दे सारी रात, देव दीनाघरी धावला इत्यादी नऊ अक्षरी कोल्हाटकरी नाटके) पण 'मैं तुलसी तेरे आँगन की' ने चक्क मला फिरकी ताणली; कारण वर वर्णिलेली ही चित्रपट-कथा मा. आ. रा. रा. श्री. चंद्रकांत काकोडकरांच्या 'अशी तुझी प्रीती' या कथेवरून बेतलेली आहे. अर्थात मूळ कथा वाचलेली नसल्यामुळे या शाकाहारीपणाचे श्रेय चंद्रकांत काकोडकरांना किती आणि दिग्दर्शक राज खोसलांनी किती, ही वाटणी मला करता येत नाही

राज खोसला हे नाव तसे चित्रसृष्टीतील बड नाव. हमखास चालणारे पठडीबाज चित्रपट देण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी तसेच स्वतःचे काही तरी वेगळे दाखविण्याचेही वैशिष्ट्य. 'तुलसी 'मध्येही त्यांनी अगदी वेचून ठोकळ्यागत दिग्दर्शकपणाचे खिळे ठोकले आहेत. उदाहरणार्थ–१) तुळशीचे प्रतीक–तुळसीच्या मृत्यूनंतर तिने लावलेले झाड संजोगितेने आपल्या अंगणात आणून लावणे. २) तुलसीच्या जीवनातील बदल-दर्शक दोन गीते–'आ जा, आ जा, मेरी बरबाद मुहब्बत के सहारे' आणि 'जवाँ है मुहब्बत, हसीं है नजारा' ३) तुलसीच्या मृत्यूच्या वेळी कुंवरजींचा तिच्या चेहऱ्यावर पडणारा मोजून एकमेव अश्रू.

याशिवाय चित्रपटात थोडेसे हास्य, मग थोडेसे रडू, मग थोडासा प्रणय, मग थोडासा संघर्ष, मग थोडेसे रहस्य असे वातावरणबदल करीत प्रेक्षकांची प्रथमपासून शेवटपर्यंत करमणूक होत राहील, याची व्यवस्थित काळजी घेतली आहेच. शिवाय एकूण चित्रपटाचा नावापासून शेवटपर्यंतचा टेंपो 'स्त्रियांची तुफान गर्दी–आबालवृद्धांनी एकत्र बसून पहावी अशी एकमेव कौटुंबिक करमणूक' या सगळयाला साजेसाचा ठेवलेला आहे.

या चित्रपटाचा एक जमेचा मुद्दा म्हणजे नूतन प्रारंभीच्या दृश्यांमध्ये म्हणजे आशा पारेख (तुलसी) बरोबरच्या भांडणामध्ये बरीच भडक व नाटकी वाटणारी संजोगिता नंतर मात्र नूतनने अत्यंत सुरेख आणि आबात सादर केली आहे. विशेषत: प्रौढ विधवा संजोगिता दोन–तीन अपवाद वगळता अत्यंत संयमाने तिने सादर केली आहे. त्यामुळे बऱ्याच वर्षांनी घरी येणाऱ्या अजयचे स्वागत करणारी पण तो आपल्या पतीचा मुलगा आहे. हे सांगू न शकणारी संजोगिता, प्रत्येक वेळी तुलसीच्या ऋणाने वाकलेली आणि म्हणून अजयला झुकते माप देणारी कृतज्ञ संजोगिता, अजयसाठी आपल्या पोटच्या पोराशी-प्रतापशी-झुंजणारी कणखर संजोगिता, नंतर अजयबद्दलच्या गैरसमजाने दुखावलेली, खचलेली, हळवी संजोगिता, ही नूतनची सारीच रूपे अत्यंत लोभस झाली आहेत ती पडद्यावर असताना पार विनोद खन्नापासून ते नवागता मीता नहलपर्यंत साऱ्यांचेच अस्तित्व एक तर जाणवत नाही आणि जाणवलेच तर खुपण्याइतके सगळे फिके पडतात आणि नूतन पडद्यावर नसतानाचा चित्रपट म्हणजे चित्र–चुरगळ पट आहे.

या चित्रपटातील विशेषत: पहिल्या पाऊण तासातील संवाद म्हणजे तर संवादलेखक डॉ. राही मासूम रझांनी प्रेक्षकांच्या कानांना दिलेली शिक्षा आहे. सर्व संवाद 'ये हाथ तेरा, इस हाथके पीछे जो बदन है वह तेरा, इस बदन में जो दिल है वह तेरा और उस दिल में जो आत्मा है वह भी तेरी!' या तऱ्हेचे. कोणतेही पात्र आपले म्हणणे साध्या, सोप्या आणि मुख्य म्हणजे थोडचा शब्दांमध्ये मांडायलाच तयार नाही. अपवाद काही नोकरांचा. ते बिचारे 'कुंवरजी, माँजी आयी हैं!' किंवा 'बिबीजी, छोटी ठकुराइन आयी हैं!' अशा थोडचा शब्दांत आपले काम संपवायचे. असल्या भयाण खोटचा, नाटकी संवादांमुळे सर्वांत तोटा झाला तो आशा पारेखचा. तिने तुलसीचे काम मनापासून करूनही अशा संवादांमुळे त्याचा प्रभाव पार धुऊन निघाला. पाऊण तासानंतरही असे संवाद चालू राहिले असते तर रिकाम्या खुर्च्यांपुढे चित्रपट सादर करण्याचे श्रेय रझासाहेबांना मिळाले असते.

बाकी पात्रांबद्दल लिहिण्यासारखे काहीच नाही, किंबहुना न लिहिण्यासारखेच बरेच आहे

'तुलसी 'चे संगीत ही एक त्याची दुसरी जमेची बाजू. पण पहिले मुजरा गीत आणि 'मैं तुलसी तेरे आँगन की' या सूत्रगीताच्या चित्रपटाच्या दृष्टीने चांगला वापर झाला आहे. बाकी दोन गीतेही–'ये खिडकी जो बंद रहती है' हे रफीसाहेबांचे गीत आणि दुसरे लता मंगेशकर आणि एका गायिकेचे द्वंद्वगीत लक्ष्मीकांत-प्यारेलालनी सुरेख दिली आहेत. मुख्य म्हणजे बहुतेक सर्व गाण्यांमध्ये त्यांचा ढोलकीचा आवडता 'लंगडा घोडा' ताल न वापरल्याने ती अत्यत श्रवणीय वाटतात. आनंद बक्षींनी काव्यात मात्र फारशी साथ दिलेली नाही; तर आपली नेहमीची शब्द जुळवण्याची सवय कायम ठेवलेली आहे

लक्ष्मीकांत-प्यारेलालनी पार्श्वसंगीताची बाजूही बहुतांशी भारतीय संगीताच्या बळावर चांगल्यापैकी तोलून धरली आहे.

प्रताप सिन्हांनी सर्व चित्रपटभर 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने छायाचित्रण केलेले–अगदी पोलोच्या खेळाची दृश्येसुद्धा टाकाऊ

काही वैशिष्ट्य नसलेल्या या आत्यंतिक सामान्य चित्रपटाची स्थिती नूतन आणि फक्त नूतनमुळेच सावरली आहे. तिच्याशिवाय हा चित्रपट म्हणजे अक्षरशः कण्याशिवायचा लोळागोळा झाला असता. □

## मुंबई वार्ता : पृष्ठ ३ वरून

आरोप पंतप्रधानांनी फेटाळून लावला व ते योग्यच होतं

अर्थशास्त्रीयदृष्ट्या खादी हे न परवडणारं आणि म्हणूनच कालबाह्य वस्त्र आहे. खादीबद्दल सामान्य लोकांना प्रेम, आदर वगैरे तर नाहीच; पण खादी आणि खादीच्या बुरख्याआड व्यवस्थित स्वार्थ साधणाऱ्यांबद्दल संतापच जास्त ! तसं नसतं तर खादी म्हणजे खा आधी, किंवा खादी म्हणजे ढोंग या व्याख्या प्रसिद्ध झाल्या नसत्या. महात्मा गांधींनंतर खादी आणि खादीधारी मंडळींची ही जी दशा झाली ती पहाता खादी म्हणजे 'गांधींची विधवा' ही किंचित टवाळखोर व्याख्याच खादीची आजची स्थिती स्पष्ट करू शकेल.

स्वातंत्र्यपूर्वी खादीच्या चळवळीत स्वदेशीचं सूत्र अनुस्यूत असल्यामुळे त्या चळवळीला एक वेगळा अर्थ होता. स्वाभाविकच खादीची वस्त्रं देशभक्तीचं प्रतीक बनली. खादीचं कापड हे चरख्यावर कातलेलं आणि हातमागावर विणलेलं असल्यामुळे त्यामुळे रोजगार वाढत असला तरी सामान्य माणसाला आज खादी परवडणारी नाही. खादीचे कपडे लवकर फाटतात आणि पुन्हा किमतीलाही महाग असतात. अशा वेळी देशातच तयार होणाऱ्या कृत्रिम धाग्यांच्या कापडाकडे सर्वांचाच कल असेल तर तो समजण्यासारखा आहे.

पण ही गोष्ट फारशी मनावर न घेता १९५६ मध्ये केंद्र सरकारने खादी आणि ग्रामोद्योग आयोग या निमसरकारी महामंडळाची स्थापना केली खेड्यांमधून चालणाऱ्या ग्रामोद्योग कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी हे महामंडळ स्थापन झालं. निवडक बावीस ग्रामोद्योग या महामंडळाच्या कक्षेत येतात. केवळ तात्त्विक भूमिकेतून हे महामंडळ स्थापण्यात आल्यामुळे प्रत्यक्षात ते फारसं कार्यक्षम ठरलेलं नाही. त्यात पुन्हा धोरणांचा आणि नियोजनाचा चांगलाच अभाव. या आयोगाच्या एका प्रशिक्षणकेंद्रात जेमतेम पंधरा विद्यार्थी आहेत आणि त्यांच्यासाठी पाच-सहा पूर्ण वेळ प्रशिक्षक, एक प्राचार्य आणि आणखी अर्धा डझन कर्मचारी काम करीत आहेत, हे एकच उदाहरण नियोजनाचा अभाव स्पष्ट करण्यास पुरेसं आहे.


जनता सरकारच्या कारकीर्दीत या आयोगाच्या कामाची पुनर्रचना होण्याची सुचिन्हं आहेत. या आयोगाचं मुंबईतील मुख्य कार्यालय अन्यत्र, एखाद्या अविकसित शहरात नेण्याची पंतप्रधानांची कल्पना होती, ती आता मागे पडली आहे. तरीही या आयोगाच्या विशेषत: खादी उत्पादन विभागाच्या पुनर्रचनेचा विचार गांभीर्यानं सुरू आहे. उद्योगमंत्री श्री. जॉर्ज फर्नांडीस यांनी गेल्या सप्ताहात या आयोगाला भेट दिली तेव्हाच या कल्पनेचं सूतोवाच केलं आहे.

खादीबरोबरच पॉलिस्टर धाग्याची निर्मितीही या आयोगानं हाती घ्यावी, अशीही एक योजना आहे. अर्थात पॉलिस्टरचं सूत चरख्यावरच कातण्यात येईल. ही पॉलिस्टरनिर्मिती करमुक्त ठेवण्याबाबतही सरकार विचाराधीन आहे निव्वळ खादीचे कपडे जाडेभरडे व कमी टिकाऊ असतात, त्यामुळे खादी व खादी आयोगानेच निर्मिलेलं पॉलिस्टर यांचे धागे हातमागावर एकत्र विणून तलम व टिकाऊ वस्त्र निर्माण होऊ शकेल. याचंच नाव 'पॉलिस्टर खादी !'

केंद्रसरकार विचार करीत असलेली ही योजना निश्चितच स्वागतार्ह आहे. त्यामुळे खादीची रोजगारक्षमता कमी न होता ती अधिक लोकप्रिय बनू शकेल.

खादी आयोगाच्या कर्मचाऱ्यांना खादीचे कपडे, निदान कार्यालयात तरी, वापरलेच पाहिजेत, असं बंधन आहे; पण तात्त्विक भूमिकेवर कदाचित खादीचा वापर जमण्यासारखा असला तरी सामान्यांच्या खिशाला खादी परवडत नाही. त्यात मुंबईच्या हवेत खादीचे जाडेभरडे डगले दिवसभर वापरणं तर अशक्यच. सहाजिकच खादी आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी यावर एक उपाय शोधून काढला. कार्यालयाच्या दारापर्यंत ही मंडळी बिगरखादीच्या वेशात येतात आणि कार्यालयात आल्यावर लगेचच एकदम 'खादीधारी' बनतात !

'पॉलिस्टर खादी' अमलात आली तर खादी कर्मचाऱ्यांचा हा त्रास वाचेल, हाही एक फायदा ! □



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
१९४८-४९
लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये